सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०१ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २७८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# बीडमधून निघाली भव्य व्यसनमुक्ती जनजागृती फेरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

लोकनेते विनायकराव मेटे यांनी उभ्या हयातीत सामजिक प्रश्नावर लढा दिला. समाज व्यसनमुक्त व्हावा यासाठी नेहमीच त्यांचा प्रयत्न राहिला त्यांच्या दुर्दैवी जाण्याने त्यांची ही चळवळ आता शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे या पुढे घेऊन जात आहेत. प्रति वर्षी प्रमाणे यंदाही तुकाराम रूरल अँड ह्युमन डेव्हलपमेंट चॅरिटेबल ट्रस्ट, बीड च्या माध्यमातून व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येत असून आज दि. ३१ डिसेंबर रोजी शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. येथील श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या जनजागृती रॅलीला हिरव झेंडा दाखवत सुरुवात केली.

श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रिडा संकुल येथून निघालेली फेरी सुभाष रोड, माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक, बशीरगंज, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात पोचली. 'मद्यपान संसाराची धुळधाण', 'व्यसनाची गोडी अन् संसाराची राखरांगोळी', 'घ्याल तंबाखुची साथ', 'आयुष्य होईल बरबाद', अशा विविध घोषणांनी परिसर दणानूण गेला. वारकरी मंडळी हे या रॅलीतील मुख्य आकर्षण ठरले त्याचबरोबर परिचर्या महाविद्यालये, शाळा, महाविद्यालयातील हजारो विद्यार्थी, तरुण, समाजातील विविध घटकांतील नागरिकांसह महिलांनीही मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला. सहभागींच्या हाती घोषणांचे फलक होते. यावेळी तंबाखू जन्य पदार्थांची होळी देखील करण्यात आली आणि जनजागृती रॅलीचा समारोप हा व्यसनमुक्तीची शपथ देऊन करण्यात आला.

यावेळी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, सुशिलाताई मोराळे,शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशिद, नितीन शेठ कोटचा ,भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, नितीन लाठकर, अनिल घुमरे पाटील, सुहास पाटील, उत्तमराव पवार ,नारायण थोरात, गौतम खटोड,ए. आर. पाटील, गोपाळ धांडे, सुभाष जाधव, बन्सी हावळे सर, बाळासाहेब हावळे, पंडित माने, गोपीनाथ घुमरे , सचिन कळकुटे, नवनाथ



प्रभाळे आदींसह प्रतिष्ठानचे , शिवसंग्रामचे शेकडो कार्यकर्ते यांच्यासह विद्यार्थी, तरुण , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून भारत पुढे येतो आहे. त्याचबरोबर आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि अनेक बाबतीत महाराष्ट्राची ख्याती आहे. असे असताना देखील २०१९ ते २१ या कालावधीमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांचा विचार करता देशात सर्वप्रथम उत्तर प्रदेश त्यानंतर पंजाब आणि महाराष्ट्राचा नंबर लागतो हे राज्यसभेमध्ये पटलावर ठेवलेल्या माहितीवरून दिसून येते हे गुन्हेगारीचे वाढते प्रमाण फक्त व्यसनामुळेच होत आहे. ही बाब संस्कृत महाराष्ट्रला वेदना देणारी आहे. याची जाणीव ठेवत लोकनेते विनायकराव मेटे यांनी ही व्यसनमुक्तीची चळवळ उभी केली ती चळवळ आम्ही निर्धाराने पुढे नेत आहोत असे प्रतिपादन डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी व्यसनमुक्ती जनजागृती रॅलीच्या समारोपाप्रसंगी व्यक्त केले. तसेच कार्यक्रमात सुशिलाताई मोराळे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव, भाजपा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, अशुतोश मेटे, शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे–काका कोयटे

## ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता अभियानास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव (प्रतिनिधी)–दिनांक २९ डिसेंबर रोजी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या परळी शाखेचा ग्राहक मेळावा व आर्थिक साक्षरता कार्यक्रम संपन्न झाला.श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत असून त्यानुषंगाने संस्थेच्या रोप्यमहोत्सव व परळी शाखेच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त परळी शाखेचा ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता. ग्राहक मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशन चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे तर प्रमुख अतिथी म्हणून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थान चे मठाधिपती श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर हे होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी. कानडे साहेब तर प्रमुख पाहुणे म्हणून मा .सोमनाथअप्पा हालगे मा. नगराध्यक्ष परळी,मा. अशोकशेठ जैन माजी चेअरमन वैद्यनाथ बँक परळी,मा दत्ताअप्पा इटके गुरुजी सचिव जवाहर एजुकेशन सोसायटी,मा.विष्णुपंत कुलकर्णी संचालक भा.शि.प्र.म.अंबेजोगाई, मा. चेतन सौंदळे माजी नगरसेवक परळी व श्री रमेश सपाटे संचालक श्री मंगलनाथ मल्टीस्टेट इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे उदघाटक श्री काका साहेब कोयटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, श्री मंगलनाथ समूह हा गेली २५ वर्षांपासून सहकार क्षेत्रात यशस्वी कार्य करत आहे. बीड जिल्ह्यातील सहकारक्षेत्राचा पाया श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्थेने उभारला असुन संस्थेचे अध्यक्ष हे निवृत्त लेखापरीक्षक असल्यामुळे त्यांनी संस्थेचे आर्थिक धोके लक्षात घेऊन कामकाज पहिले त्यामुळे संस्था गेली २५ वर्षांपासून अविरत आपल्या सेवेत भक्कम उभी आहे.सोनेतारण कर्ज सारख्या सुरक्षित कर्जा ला प्राधान्य देत ठेवीदारांना भक्कम सुरक्षा कवच निर्माण करण्याचे कार्य संस्थेने केले आहे.. मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेचे सहकार चळवळीत महत्वपूर्ण योगदान राहिले असून आर्थिक साक्षरता अभियान राबवत ग्राहकांमध्ये जनजागृती करणारी मंगलनाथ ही पहिली संस्था आहे असे गौरव उद्गार त्यांनी काढले, यापुढे देखील संस्था सभासदांच्या गरज जाणून कार्य करत राहील व सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करत सर्व सहकारी पतसंस्थांसाठी दीपस्तंभा प्रमाणे कार्य करत राहील असा विश्वास व्यक्त करत संस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष आर.जी. कानडे साहेब यांनी अध्यक्षीय समारोप केला व सांगितले कि संस्थेला २५ वर्ष पूर्ण होत आहेत या २५ वर्षातील एकंदरीत गुणवत्ता पूर्वक प्रगतीमध्ये सभासद वर्गाचे मोलाचे सहकार्य सभासदांचे लाभले त्यामुळे सभासदांचे आभार व्यक्त करतो व येत्या काळामध्ये संस्था सभासदांकरिता अनेक उपयोगी योजना राबवणार असून संस्थाया पुढे देखील सभासदांचे हित जोपासून कार्य करेल असे आश्वासन दिले. कार्यक्रमास परळी परिसरातील मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री रवींद्र कानडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता शाखेचे व्यवस्थापक गजानन हालगे उमाकांत काळे, मुळे आनंद श्री सर्वेश सपाटे यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

# बाल साहित्य परिषद शाखा,बीड व सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड तर्फे फिरते वाचनालय ग्रंथपेटी शिवाजी विद्यालय बीड यांना सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी बालरंगभूमी परिषद शाखा बीड जिल्हयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते श्री.शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.आमटे विक्रम यांना फिरते वाचनालयाची ग्रंथपेटी सुपूर्त करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.



सौ.के.एस.के.महाविद्यालय आणि बीड बालरंगभूमी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा फिरत्या वाचनालयाचा उपक्रम राबवला जात आहे.मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून शासनस्तरावरती विविध उपक्रम राबवले जात आहे. त्याचा एक भाग म्हणून हे फिरते वाचनालय बीड येथील शिवाजी विद्यालयाचे ग्रंथपाल यांना ही पुस्तक पेटी सुपूर्त करण्यात आली आहे.

यावेळी मनोगत व्यक्त करताना नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर म्हणाल्या की, लहान वयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरूची निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आवश्यक आहे.यामुळे विद्यार्थ्यांना थोर व्यक्तींचे चरित्र वाचून प्रेरणा मिळेल.देशाला सुजान नागरीक तयार करण्यासाठी याचा फायदा होईल.या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.शेख जी.आय तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



भाजपा संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियानात बोलतांना सदस्य नोंदणी अभियानाचे भाजपाचे नवनाथ आण्णा शिराळे पाटील दिसत आहेत.

# सिद्धीविनायक अर्बनच्या दिनदर्शिका चे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ डिसेंबर**

मंगळवार दि. ३१, माजलगाव, सिद्धीविनायक अर्बन को–ऑप. क्रे. सो. लि. माजलगाव च्या २०२५ दिनदर्शिकेचे लोक प्रकाशन उत्साहात करण्यात आले.याप्रसंगी सेवा समितीचे जिल्हा अध्यक्ष डॉ. किशोर रत्नपारखी, श्री. सिद्धेश्वर माध्यमिक विभागाचे प्रमुख प्रशांत भानप, भाजपा सोशल मीडियाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ता महाजन मा. सरपंच प्रल्हाद दळवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ प्रशांत पाटील संचालक विनायक रत्नपारखी कैलास जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी बोलताना सिद्धीविनायक अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील म्हणाले की सिद्धीविनायक अर्बन संस्था ही पहिल्या वर्षापासून आजतगायत आपल्या उत्कृष्ट कामामुळे अ वर्ग असलेली एकमेव संस्था आहे, संस्थेला आय.एस.ओ. ९००१:२०१५ नामांकन आहे, संस्था संपूर्ण संघनीकृत आहे, संस्थेत कोअर बँकिंग सुविधा आहे, संस्थेचा शैक्षणिक सामाजिक व सहकार चळवळीत सहभाग, आय.एम.पी.एस, एन.इ.एफ.टी, आरटीजीएस ची सुविधा असलेली संस्था, ठेवीवर आकर्षक व्याजदर व सर्व प्रकारचे कर्ज देणारी संस्था, सर्वात महत्वाचे म्हणजे पारदर्शक कारभार, तत्पर व विश्वसनीय सेवा देणारी संस्था असे अनेक वैशिष्ट्ये असणारी व अल्पावधीतच नावारुपाला आलेली आपली सिद्धीविनायक अर्बन को ऑप. क्रे. सो. लि. हि आपली संस्था असल्याचे त्यांनी बोलताना डॉ. प्रशांत पाटील यांनी सांगितले.याप्रसंगी संस्थेचे सर्व संचालक मंडळ स्थानिक सल्लागार व कर्मचारी उपस्थित होते.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान

## प्रस्तावासठी ५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा या स्पर्धेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणे तसेच अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक pragatiabhiyan.maharashtra.gov.in अशी आहे.



दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा–या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे.

स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने पाठविण्याच्या सूचना सामान्य प्रशासनाचे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिल्या आहेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

# लातूर पॅटर्न प्रमाणे मोटे क्लासेस ने नाव करावे–तहसीलदार संदिप खोमणे



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३१ डिसेंबर**

मोटे कोचिंग क्लासेसच्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी बोलताना तहसीलदार संदिप खोमणे यांनी मोटे कोचिंग क्लासेसचे कौतुक करीत महाराष्ट्रात लातूर पॅटर्न तर गेवराईमध्ये मोटे पॅटर्न हे नाव अबाधित राहण्यासाठी येथील शिक्षकांनी हे नेहमीच प्रयत्नशील राहून आपल्या क्लासेसचे विद्यार्थी चांगल्या हुद्द्यावर नोकरीस लागतील यासाठी प्रयत्न करावे.


गेवराईमधील मोटे कोचिंग क्लासेस गेल्या पाच वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्तम दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळवून देत आहे .गेल्या काही वर्षापासून मोटे कोचिंग क्लासेसमधील विद्यार्थी बारावी बोर्ड या परीक्षेत तालुक्यामधून प्रथम क्रमांक मिळवत असल्याचे क्लासेसचे संचालक प्रा. डॉ. नागनाथ मोटे यांनी सांगितले. तर तहसीलदार संदिप खोमणे यांनी शिक्षकांचे कौतुक करीत विद्यार्थी चांगले शिक्षण देऊन विद्यार्थी चांगल्या हुद्द्यावर नोकरीस लागतील यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले. यावेळी गेवराई चे तलाठी मेजर माणिकराव पांढरे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, जेष्ट पत्रकार प्रा राजेंद्र बरकसे, शिवसेना ता.प्रमुख शिनुभाऊ बेदरे, संपादक अमोल वैद्य, गोपाल मोटे,यशवंत पाटील,प्रा अभिजीत तौर आदींची उपस्थिती होती. या सर्व उपस्थित मान्यवरांचे प्रा. डॉ. नागनाथ मोटे यांनी आभार मानले.

# पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी आयोजन

## सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर पुरस्काराचे मानकरी ; धृपद गायन जुगलबंदी रंगणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ डिसेंबर**

तपस्वी पखावज साधक पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांच्या २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन अंबाजोगाईत ३ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी हे सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर जयपूर (राजस्थान) हे आहेत. यावेळी आयोजित संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदी रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धव बापू आपेगावकर यांची साथसंगत लाभणार आहे. अशी माहिती आपेगावकर परिवार यांच्या वतीने देण्यात आली आहे.




शहरातील हॉटेल ईट एँड स्टे हॉल, बडोदा बँकेच्या वर, मोंढा रोड, अंबाजोगाई येथे शुक्रवार, दि.३ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गंगा माऊली शुगर्स केज व उद्योग समूह, लातूरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे तर अध्यक्षस्थानी साई शुगर व उद्योग समूह, रांजणी, धाराशिवचे चेअरमन बी.बी.ठोंबरे हे असणार आहेत. तर एमआयटी–एडीटी विद्यापीठ, लोणी काळभोर, पुणे कार्यकारी अध्यक्ष व कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर, जयपूर (राजस्थान) यांना पद्मश्री शंकरबापूजी धृपद गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.नंदकुमार सोमवंशी हे उपस्थित राहाणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर सुप्रसिद्ध धृपद गायक उस्ताद अनिसोद्दिन डागर आणि उस्ताद नफिसोद्दिन डागर यांच्या संगीत सभेत धृपद गायन जुगलबंदीची मैफल रंगणार आहे. त्यांना पंडित उद्धवराव बापू आपेगावकर यांची पखावज साथसंगत लाभणार आहे. तरी या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक आणि संगीत रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पद्मश्री शंकरबापू आपेगावकर परिवार, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०१ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २७८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० च्या प्रकल्पास अधिक गती द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. ३१ : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा महाराष्ट्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम आहे. या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून काम करत असतांना प्रकल्प विकासकांना ज्या ठिकाणी अडीअडचणी येत असतील, तर संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा बैठक घेऊन घेऊन त्या समस्या सोडवाव्यात. यासंदर्भातील अहवाल पुढील १५ दिवसामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबवितांना प्रकल्प विकासकांना आता ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याने नमुद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जमीन अतिक्रमीत झालेल्या ठिकाणी प्रकल्प विकासक तसेच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित बैठक घ्यावी. त्याचप्रमाणे विकासकांना येणाऱ्या अतिक्रमीत जमिनीसंदर्भात समस्या सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी.



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाकरिता प्रकल्प विकासकांना लागणाऱ्या आवश्यक सर्व परवानग्या ऑनलाईन देण्याचे निर्देश करत मुख्यमंत्री म्हणाले की, हा प्रकल्प राबवितांना काही अडीअडचणी येत असतील आणि त्या जिल्हापातळी, गावपातळीवर सोडविणे शक्य नसेल तर त्या मंत्रालय स्तरावर सोडविल्या जातील. कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन कार्यान्वित होईल, या कामाकडे सर्वांनी जबाबदारी पूर्वक पाहण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० ची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, अतिरिक्त व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, प्रधान सचिव एकनाथ डवले, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव, श्रीकर परदेशी, नाशिक जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्य विद्युत निरिक्षक संदीप पाटील, ऊर्जा विभागाचे वरीष्ठ अधिकारी त्याचप्रमाणे दुरदृष्य प्रणालीद्वारे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे तसेच पुणे, जालना, लातूर, अहिल्यानगर, नंदुरबार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच या प्रकल्पाचे विकासक उपस्थित होते.

# बीड हत्येप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड सीआयडीसमोर शरण!

पुणे : बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख निर्घृण हत्या प्रकरणातील मोठी बातमी समोर आली आहे. बीड सरपंच हत्येप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार झाले होते. दरम्यान आज त्यांनी व्हिडिओ शेअर करत पुण्यात सीआयडीसमोर शरण आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी पोलिसांकडून शोध सुरु असताना वारंवार वाल्मिक कराड यांचे नाव समोर येत होते. हत्या प्रकरणात संबंध असल्याचा ठपका ठेवण्यात आलेले वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार होते. तर आज वाल्मिक कराड स्वत: पुणे सीआयडीकडे शरण गेला आहे. तसेच ते सीआडीच्या गाडीने न जाता स्वत:च्या गाडीने गेले आहेत.



**सरेंडर होण्यापूर्वी दिली प्रतिक्रिया**

'मी वाल्मीक कराड केज पोलीस स्टेशनला खोटी खंडणीची फिर्याद दाखल झालेली आहे. मला अटकपूर्वचा अधिकार असताना मी सीआयडी ऑफिस पुणे पाषाण रोड येथे सरेंडर होत आहे. सरपंच संतोष भैय्या देशमुख यांचे जे कोणी मारेकरी आहे, त्यांना अटक करावी. त्यांना फाशीची शिक्षा व्हावी. केवळ राजकीय द्वेषापोटी या प्रकरणाशी माझे नाव जोडले जात आहे. पोलीस निष्कर्षात मी जर दोषी आढळल्यास न्यायदेवता जे काही शिक्षा देईल ते मी भोगण्यास तयार आहे. अशी प्रतिक्रिया कराड यांनी दिली आहे.

दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी फरार झाले आहेत. सध्या फरार आरोपींचा शोध सुरु आहे.

## पुण्यात साजरा होणार भव्य आर्मी डे!

पुणे : भारतीय सैन्यदलाचा ७७ वा वर्धापन दिन यंदा पुण्यात साजरा होत आहे. यानिमित्त आळंदी रस्त्यावरील बॉम्बे सॅपर्स या लष्करी संस्थेच्या मैदानावर भव्य कार्यक्रम होणार आहे. यानिमित्त ३ ते १५ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. भारत देश स्वतंत्र होताच १५ जानेवारी १९४९ रोजी भारतीय लष्कराच्या प्रमुखपदी ले. जन. के. एम. करिअप्पा यांची निवड झाली. तेव्हापासून १५ जानेवारी हा भारतीय लष्कराचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो.

## प्रत्येकाच्या स्मृतीकोषात शिक्षकाचे स्थान अढळ : दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.३१(जिमाका):- प्रत्येकाचे शिक्षक आणि त्यांच्या स्मृती ह्या बालमनावर कायमच्या कोरल्या जातात. प्रत्येक व्यक्तिच्या स्मृतीकोषात शिक्षकांचे स्थान नेहमी अढळ असते, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शिक्षकांची महती सांगितली. त्यामुळे शिक्षकांनी अधिक सजगतेने भावी नागरिक घडविण्याचे आपल्यावर सोपवलेले कर्तव्य पार पाडावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज पैठण येथे केले.



पैठणच्या सेंट पॉल हायस्कूल येथील सभागृहात आज 'दशसूत्री' अंमलबजावणीसाठी पैठण तालुक्यातील जि.प. शाळा मुख्याध्यापकांची कार्यशाळा पार पडली. उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी(माध्य.) आश्विनी लाटकर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य सान्वी देशमुख, तहसिलदार सारंग चव्हाण, उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांना घडविणे हे अत्यंत पवित्र कार्य आहे. मुलांना देशाचे भावी नागरिक म्हणून आपण घडवित आहोत ह्या जबाबदारीचे भान असू द्यावे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाठी दशसूत्री कार्यक्रम तयार केला आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता नाही. वेगळा वेळ द्यायची गरज नाही. हा कार्यक्रम आपल्याला आपली दैनंदिन शैक्षणिक काम करीत असतांनाच करता येणार आहे. या कामातून आपल्याला चांगले काम केल्याचे समाधान मिळणार आहे,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. प्रत्येकाच्या स्मृतीत आपल्या शिक्षकांच्या स्मृती कायम कोरल्या जातात. त्या नेहमी चांगल्या रहाव्या यासाठी आपण सगळ्यांची सचोटीने आपले कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे,असेही त्यांनी सांगितले. सुत्रसंचालन किरण गाडेकर तर आभारप्रदर्शन अनिल पुल्हाट यांनी केले.

## मिठातील आयोडिनच्या गुणांमुळे उंचावले जीवनमान

मुंबई – १९८३ पासून टाटा सॉल्ट भारतातील आयोडिन कमतरतेच्या समस्येला तोंड देण्यात आघाडीवर आहे. व्हॅक्यूम-इव्हॅपोरेटेड आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध करणारा पहिला ब्रँड या नात्याने टाटा सॉल्ट लाखो भारतीयांच्या घराघरात पोहोचले आहे. टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फुड्स विभागाच्या अध्यक्ष दीपिका भान म्हणाल्या, 'टाटा सॉल्ट गेल्या कित्येक वर्षांपासून आयोडिन कमतरतेच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आयोडिनचे योग्य प्रमाण असलेले मीठ पुरवण्यासाठी बांधील आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आमचा ब्रँड लाखो भारतीयांचे स्वास्थ्य जपण्यासाठी दर्जेदार उत्पादने पुरवत आहे.'इंडिया आयोडिन सर्व्हे २०१८-१९ नुसार टाटा सॉल्टने आयोडिन डेफिशियन्सी डिसऑर्डरचे प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशांतील २१,४०६ घरांत करण्यात आलेल्या या सर्व्हेनुसार आयोडाइज्ड मिठाच्या वाढत्या वापरामुळे आयोडिनची कमतरता कमी झाली आहे. मात्र, या सर्व्हेनुसार राष्ट्रीय स्तरावर आयोडीनचे प्रमाण १५ पार्ट्स प्रति दशलक्ष (पीपीएम) समान किंवा त्याहून अधिक असलेले घरगुती कव्हरेज फक्त ७६.३ टक्के आहे. पंजाबमध्ये पुरेशा प्रमाणातील आयोडाइज्ड मिठाचे घरगुती कव्हरेज केवळ ८४.७ टक्के असून ६१.५ टक्के लोकांना आजही आयोडाइज्ड मिठाची माहिती नाही.

### सकल ब्राह्मण समाज महासंघ अहिल्यानगर यांच्या वतीने आ.संग्राम जगताप यांचा नागरी सत्कार संपन्न

# विधानसभा निवडणुकीमध्ये हिंदू एकवटला आणि हिरव्या गुलाला ऐवजी भगवा गुलाल उधळला - आ.संग्राम जगताप

अहिल्यानगर : विधानसभा निवडणूक सुरू होण्या अगोदरच ब्राह्मण समाजाने मेळावा घेऊन सर्वात प्रथम पाठिंबा दिला आणि माझा प्रचार देखील केला आहे. शहराच्या विकास कामाबरोबरच हिंदुत्वाची जबाबदारी स्वीकारली आहे. ब्राह्मण समाजाच्या वतीने शहरात श्री भगवान परशुराम यांचे भव्य मंदिर उभे राहत असल्यामुळे वर्षभरात फोटोचे रूपांतर मूर्तीमध्ये होणार आहे. निवडणुका येत असतात आणि जात असतात त्यामुळे काही लोक फक्त जत्रेतल्या पाहुण्यासारखे येतात आणि जातात मात्र आम्ही पाचही वर्ष समाजामध्ये काम करत असतो नगरकर हुशार असून त्यांनी देखील काम करणाऱ्यालाच संधी दिली आहे. या निवडणुकीमध्ये ब्राह्मण समाजाची भूमिका महत्त्वाची ठरली



आहे. हिंदू वर्ग देखील जागा झाला असून त्यांनी लोकसभेची चूक दुरुस्त केले आहे. या विधानसभा निवडणुकीमध्ये हिंदू एकवटला आणि हिरव्या गुलाला ऐवजी भगवा गुलाल उधळला. राजाभाऊ पोतदार यांनी ब्राह्मण समाज एकसंघ करण्याचे काम केले आहे ह.भ.प मंदार बुवा रामदासी यांचा राजकारणाशी कुठलाही संबंध नसताना माझ्या साठी व हिंदुत्वासाठी काम केले आहे शहरामध्ये अध्यात्मिकता वाढीसाठी काम केले जाईल असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

सकल ब्राह्मण समाज महासंघ अहिल्यानगर यांच्या वतीने आमदार संग्राम जगताप तिसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी ह.भ.प मंदार बुवा रामदासी, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पोतदार, दत्तोपंत पाठक गुरु, डॉ.एस.व्ही जोशी, सुधीर भापकर, ह.भ.प प्रभाताई भोंग, सुरेश शिरसागर, एन.डी कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी, नंदकुमार पोळ, अभिनेते मोहिनीराज गटणे, राजाभाऊ आडकर, राजेश भालेराव, विलास देशमुख, प्रियाताई जानवे, वंदना पंडित, श्याम रेणावीकर, मोरेश्वर मुळे, कालिंदी केसकर, चेतन वसगढेकर, विजय देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, किरण वैकर, मंगेश निसळ, दी.ना जोशी, योगेश दानी, सुवर्णा महापुरुष आदीसह ब्राह्मण समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजाभाऊ पोतदार म्हणाले की आमदार संग्राम जगताप यांच्या विजयाचा जल्लोष ब्राह्मण समाजाने केला आहे. आम्ही पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मतदान केले आहे. कारण मा.आमदार अरुण काका जगताप आणि आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच सामाजिक कार्याची भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे. शहरांमध्ये श्री भगवान परशुराम यांचे मंदिर उभे राहावे यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी प्रयत्न केले व आम्हाला जागा दिली लवकरच मंदिराचे कामही पूर्ण होईल. सकल ब्राह्मण समाज महासंघाच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचा नागरिक सत्कार मोठ्या उत्साहात व मंत्रमुग्ध आशीर्वादाने संपन्न झाला असल्याचे ते म्हणाले. एन डी कुलकर्णी म्हणाले की आमदार संग्राम जगताप यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये दाखवून दिले आहे की एकही सभा न घेता निवडणूक जिंकली. व्यक्तिगत संपर्क मोठा असल्यामुळे पक्षीय राजकारणापेक्षा आमदार संग्राम जगताप यांच्या कामाला लोकांनी मते दिली असल्याचे ते म्हणाले.

## कलाकारांनी नववर्ष पार्टीसाठी सांगितल्या फॅशन टिप्स!

सर्वजण स्टाइलमध्ये नववर्ष २०२५ चे स्वागत करण्यासाठी सज्ज असताना पार्टी प्लान्स जल्लोषात सुरू आहेत. पण मनात एक चिंता नेहमी भेडसावते, ती म्हणजे या मोठ्या नाइट पार्टीसाठी आकर्षक ड्रेस परिधान करण्यासोबत कशाप्रकारे ग्लॅमरस दिसावे. सुदैवाने, एण्ड टीव्हीवरील प्रमुख नायिकांनी काही सर्वोत्तम फॅशन व मेक-अप टिप्स सांगितल्या आहेत, ज्यामधून तुम्ही प्रत्येक सेलिब्रेशन पार्टीमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेण्याची खात्री मिळेल. या अभिनेत्री आहेत नेहा जोशी (मालिका 'अटल'मधील कृष्णा देवी वाजपेयी), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी). मालिका 'अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी म्हणाल्या, ''विंटर पार्टी आकर्षक दिसण्यासंदर्भात प्रयोग करण्यासाठी सर्वोत्तम काळ असतो.

## देशी गायींचे पालन पोषण अनुदानासाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ५ जानेवारीपर्यत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ३१ डिसेंबर :** राज्यातील गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमधील देशी गायीच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रति पशु ५० रुपये अनुदान देण्यात येणार आहे. अनुदानासाठी ५ जानेवारी २०२५ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी पात्र गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्थानी www.mahagosevaayog.org d https://schemes.mahagoseeraayog.org या संकेतस्थळावर ५ जानेवारी २०२५ पर्यत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नांदेड यांनी केले आहे.

या योजनेचा ऑनलाईन अर्ज व त्यासोबत जोडावयाची कागदपत्रे याबाबतची सविस्तर माहिती www.mahagosevaayog.org d https://schemes.mahagoseeraayog.org या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सुधारित नियोजित वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. या योजनेचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यासाठी १६ डिसेंबर २०२४ ते ५ जानेवारी २०२५ कालावधी दिला आहे. गोसेवा आयोगामार्फत प्राप्त अर्जाची प्राथमिक तपासणी ६ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत होणार आहे. जिल्हा गोशाळा पडताळणी समितीद्वारा प्राथमिक तपासणी अंती पात्र गोशाळांची प्रत्यक्ष भेट व पडताळणी ११ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत होणार आहे. जिल्हा गोशाळा पडताळणी समिती अहवालानुसार अनुदानास पात्र गोधनाची संख्या आयोग कार्यालयास २१ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत कळविण्यात येणार आहे.

## संत श्री ज्ञानेश्वर महाराज हे वारकरी संप्रदायाचे एक स्तंभ आहेत - श्रीगुरुमाऊलीमहाराज चातुर्मास्ये

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ डिसेंबर

सोयगाव तालुक्यातील पळाशी येथे संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र व अखंड हरिनाम सप्ताह दि.२९ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२५ पर्यंत संपन्न होत आहे, संत श्रीज्ञानेश्वरमहाराज हे वारकरी संप्रदायाचे एक स्तंभ आहेत असे प्रतिपादन श्रीक्षेत्र अनवा - पंढरपूर संस्थानचे पंधरावे विद्यमान पीठाधिश पू. श्रीगुरुमाऊलीमहाराज चातुर्मास्ये यांनी केले आहे.

महाराज पुढे म्हणाले, भगवान श्रीज्ञानेश्वर माऊलींनी या संप्रदायाला एक नवीन दिशा दिली आणि त्याचे विस्तार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान सोप्या मराठी भाषेत सर्वसामान्यांना कळावे म्हणून ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथ लिहिला आहे. ज्ञानेश्वरी हा वारकरी संप्रदायाचा पाया मानला जातो. या ग्रंथातून संप्रदायाचे मूलतत्त्व,



भक्तीमार्ग आणि सामाजिक सद्भाव यांचे स्पष्टीकरण मिळते.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अभंगांमधून भक्तीमार्गाचा प्रचार केला. त्यांच्या अभंगांमध्ये भगवान विठ्ठल आणि रुक्मिणी देवीची भक्तीभावना व्यक्त झाली आहे.भक्तीमार्गामुळे सर्व जातीधर्मातील लोक एकत्र आले. त्यांनी समाजात प्रेम, शांती आणि बंधुत्व या मूल्यांचा प्रसार केला आहे.असे श्रीगुरु माऊली महाराजांनी सांगितले,यावेळी गावातील भाविकांनी कथेसाठी जास्तीत जास्त उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी जनजागृतीवर भर द्या : जिल्हाधिकारी

### बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आढावा बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**नांदेड,दि. ३१ डिसेंबर**

जिल्ह्यात बालविवाह होवू नये यासाठी महिला बाल विकास विभाग, युनिसेफ एसबीसी ३ च्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. १८ वर्षाखालील मुला-मुलींचे लग्न लावू नयेत ते केल्यास काय शिक्षा होवू शकते हे सर्वांना माहिती पाहिजे. यासाठी कायदयाची जनजागृती व प्रबोधन करण्यावर भर द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिल्या.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिजीत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी



जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) प्रशांत थोरात, मनपाचे उपायुक्त अजितपाल सिंघ संधु, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक संतोष शेटकार, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक रामचंद्र पांचगे, डॉ. विद्या झिने, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस.डी. पवार, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयक चंदा रावळकर, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापिठाचे डॉ. अमोल प्रभाकर काळे, युनिसेफ, एसबीसी ३ चे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक विकास कांबळे, जिल्हा समन्वयक मोनाली धुर्वे आदींची उपस्थिती होती.

जिल्हयात बालविवाह होवू नये यासाठी नागरिकांपर्यंत कायदेशीर कार्यवाहीबाबतची माहिती पोहचविणे अत्यंत आवश्यक असून या विषयावर जनजागृती व प्रबोधन करावे. तसेच यावर्षी कन्या दिवसाच्या निमित्ताने शपथ व मुलींचे बालविवाह न करणेबाबत पालकांना पत्र लिहून कळविण्याचे उपक्रम राबवावेत असे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी सांगितले. तसेच १८ वर्षाखालील मुला-मुलींचे बाल विवाह होणार नाहीत याबाबत शिक्षकांनी जागृती करण्यावर भर द्यावा असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा महिला बाल विकास विभाग नांदेड युनिसेफ आणि एसबीसी ३ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा बालविवाहमुक्त करण्याच्या दृष्टीने मागील ४ महिन्यात केलेल्या कार्यवाहीबाबत व पुढील महिन्यात करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबतचा आढावा यावेळी सादर करण्यात आला. तसेच शाळेतील मुलांसाठी विद्यार्थी सत्र, पालक जागरुकता सत्र कार्यक्रम असे विविध कार्यक्रम मागील कालवधीत घेण्यात आले याबाबत सादरीकरण करण्यात आले.

खुश हाऊसिंग फायनान्स

**खुश हाऊसिंग फायनान्स प्रा. लि.**

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ८१०, ऑरा बिप्लेक्स, एसव्ही रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२, वेब : www.khfl.co.in

**सार्वजनिक सूचना**

सर्व सामान्य जनतेला आणि ग्राहकांना याद्वारे कळविण्यात येते की **खुश हाऊसिंग फायनान्स प्रा.लि.**ची औरंगाबाद शाखा **२०३, सम्यक गॅलेरिया, सूतगिरणी चौक, गारखेडा, औरंगाबाद-४३१००५ येथे कार्यरत होती, आता नवीन कार्यालय म्हणजेच कार्यालय क्र.१०९, येथे स्थलांतरित करण्यात आली आहे. अव्हेन्यू, ७ प्लॉट नं.०७, खुशाल नगर, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद).**

सर्व सामान्य जनतेने आणि ग्राहकांनी याची नोंद घ्यावी ही विनंती. औरंगाबाद शाखेतील सर्व विद्यमान ग्राहकांना या नवीन शाखेतून सेवा देणे सुरू राहील.

**तारीख: ०१.०१.२०२५** — एसडी/-

**ठिकाण : औरंगाबाद** — **खुश हाऊसिंग फायनान्स प्रा.लि.**

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# नवोन्मेषाची पूर्वपहाट...

दिवसांमागून दिवस सरतात, महिन्यांमागून महिने मागे पडतात, वर्षांमागून वर्षे जातात आणि मागे जाणारा प्रत्येक क्षण, प्रत्येक दिवस आपल्या काही खुणा मागे ठेवून पुढचा दिवस भविष्यकाळाच्या हाती सोपवितो. तरीही, सरणारा प्रत्येक दिवस स्मरणात राहातोच असे नाही. काही दिवस इतिहासाच्या पानांवर आपला ठसा उमटवितात, तर काही दिवस केवळ औपचारिकपणे उगवून मावळूनही जातात. असे दिवस आठवणींतून वजा केले, तरी उरलेल्या दिवसांच्या आठवणींची साठवण मनाच्या कप्प्यात आपली अढळ जागा निर्माण करत असतात. गेल्या चार-पाच वर्षांत अशा अनेक दिवसांनी मनामनांतील आठवणींचे कप्पे व्यापले असले, तरी सरत्या वर्षाने मात्र, यावरही मात केली आहे. काहीच घडले नाही, कसलीच नोंद नाही असा एखादा दिवस या वर्षात अभावानेच उगवला असेल. म्हणूनच, सरते वर्ष स्मरणीय ठरणार आहे आणि आपल्या भूतकाळात जाताना नव्या वर्षाच्या पहिल्या क्षणाच्या हाती भविष्य सोपवून या वर्षाच्या अखेरचा क्षण मागे पडून नव्या वर्षाचा क्षण उगवेल, तेव्हा त्या क्षणावर मावळत्या वर्षाच्या त्या पाऊलखुणांची सावली दाटलेली असेल. एका अर्थाने, उद्यापासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षासमोर, जुन्या वर्षातील असंख्य अविस्मरणीय आठवणींच्या तुलनेचे आव्हान असणार आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात आणि जगातही अशा अनेक घटनांनी आपली नोंद सरत्या वर्षाच्या इतिहासावर करून ठेवली आहे आणि त्या नोंदींच्या पाऊलवाटांवरच उद्यापासून सुरू होणाऱ्या नव्या वर्षाची वाटचाल होणार आहे.

गेल्या वर्षभरात महाराष्ट्राने आणि देशानेही अनेक स्थित्यंतरे अनुभवली. सामान्य माणसाच्या जगण्यावर त्याचा प्रभाव पडलाच, पण देशाच्या वर्तमानकाळावर आणि भविष्याच्या वाटचालीवरही त्याचा प्रभाव राहणार आहे. विशेषतः, देशाच्या राजकीय क्षितिजावर सरत्या वर्षाने उमटविलेल्या पाऊलखुणांची सावली नव्या वर्षावरही राहणार आहे. सरत्या वर्षाने देशाच्या राजकारणात अनेक अनपेक्षित, अपेक्षित वळणे घेतली, काही घडामोडी अनाकलनीय ठरल्या, तर काहींनी अपेक्षापूर्तीचे समाधान जनतेस दिले. लोकसभेच्या निवडणुकांपासून राज्याराज्यांतील विधानसभा निवडणुकांनी राजकारणाच्या पटलावर एका नव्या इतिहासाची नोंद केली आणि अनेकांच्या भविष्यावर प्रश्नचिन्हेही उमटविली. राजकारणातील अनेकांसमोर राजकीय अस्तित्वाची आव्हाने उभी केली, तर अनेकांच्या भविष्यातील राजकारणाच्या वाटचालीस विश्वासाची साथ देऊन आश्वस्त केले. विशेष म्हणजे, या घडामोडींचा नेमका अंदाज कोणालाच आला नाही, अनेकांनी वर्तविलेली भाकिते फोल ठरली आणि राजकारणातील धुरंधरांच्या अनुभवाला धक्केही बसले. देशातील लोकसभेच्या निवडणुका हे याचे नेमके उदाहरण ठरले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारच्या दोन पर्वांची पुण्याई गाठीशी घेऊन नव्याने लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने या निवडणुकीकरिता चारशे जागांवर विजय मिळविण्याचे उत्तुंग लक्ष्य निर्धारित केले होते. जनतेने मोदी सरकारला मजबूत जनाधार बहाल केला, पण हे लक्ष्य गाठण्याची संधी मात्र हुकली. महाराष्ट्रातील हुकमी जनाधाराला काहीशी गळती लागल्याने, लागोपाठ होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीतील यशावरही शंकेचे सावट दाटले होते, पण सुज्ञ मतदारांनी विधानसभेत भाजपाच्या झेंड्याखालील महायुतीच्या हाती अविश्वसनीयरीत्या यशाची विक्रमी पताका बहाल केली. अनेकांना महायुतीचा हा विजय पचविता आला नाही, काहींना तो अनाकलनीय वाटला आणि अनेकांच्या राजकीय भविष्यावरच या निकालांनी प्रश्नचिन्हेही उमटविली. म्हणून, महाराष्ट्रातील मावळते वर्ष राजकीयदृष्ट्या ऐतिहासिक ठरले. महायुतीसाठी विक्रमी ठरले आणि महाराष्ट्राच्या सत्तेची स्वप्ने रंगवत भविष्यकाळ काबीज करण्याच्या वल्गना करणाऱ्या अनेकांना जोरदार धक्के देऊन नव्या गणितांची मांडणी करण्यास भाग पाडणारेही ठरले. आगामी वर्षाच्या राजकारणात त्याचे पडसाद उमटणार आहेत, यात शंका नाही. अनेकांना आपल्या अस्तित्वासाठी नवी राजकीय गणिते मांडावी लागतील. जुन्या, पठडीबाज राजकारणाच्या अनुभवांच्या आधारावर नव्या राजकारणाचे इमले उभारण्याचा काळ मागे पडल्याची कटू जाणीवही सरत्या वर्षाने अनेकांना करून दिली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणास सरत्या वर्षाने शिकविलेला हा सर्वांत मोठा धडा ठरला आहे. काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० निष्प्रभ ठरल्यानंतर प्रथमच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला सत्तासंपादनाची अपेक्षा होती, पण तसे घडले नाही. झारखंडच्या विधानसभा निवडणुकीतही भाजपाला अपेक्षित असलेल्या सत्तेने हुलकावणी दिली, तर हरयाणाच्या विधानसभा निवडणुकीत भल्याभल्यांची भाकिते खोटी ठरवून तेथील जनतेने भाजपाच्या हाती सत्ता सुपूर्द केली. काळ हा राजकारणावर प्रभाव टाकणारा मोठा घटक असतो. राजकारणातील कोणत्याही घडामोडींच्या आलेखाचा पाया काळावरच बेतलेला असतो. म्हणूनच, प्रत्येक घटनेची तुलना काळासोबत केली जाते. काळाच्या ओघात कधी प्रभावशाली ठरलेल्या राजकारणाची किंमत पुढच्या काळात शून्यावर पोहोचलेली असते, तर एखाद्या राजकारणाचा भाव अनाकलनीयपणे कमालीचा वधारलेला असतो. महानगरी दिल्लीच्या राजकारणात सरत्या वर्षात असेच काहीसे घडून गेले. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना काळाने दिलेला दणका ही राजकारणाच्या इतिहासातील सरत्या वर्षातील सर्वांत मोठी घटना ठरली. अनैतिक राजकारणाचा ठपका बसलेल्या अरविंद केजरीवाल यांची तिहारमधील तुरुंगवारी, तेथून बाहेर पडल्यानंतर त्यांनी दिलेला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा आणि नव्या जनाधारासाठी त्यांनी सुरू केलेले राजकारण यातून राजधानी दिल्लीच्या राजकारणासमोर अनेक नवे प्रश्न उभे राहिले. झारखंडमध्येही अशाच इतिहासाची काळाने कसोटी पाहिली. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना कथित भ्रष्टाचाराच्या आरोपावरून गजाआड होण्याची वेळ सरत्या वर्षातील काळाने आणली. याच काळात तेथे निवडणुका झाल्या आणि पुन्हा सत्ता संपादन करून सोरेन मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अमेठी मतदारसंघातून राहुल गांधी यांना पराभव पाहावा लागला होता. पुढच्या पाच वर्षांत काळाने राहुल गांधी यांची पुरेपूर कसोटी पाहिली आणि सरत्या वर्षात पुन्हा याच मतदारसंघातून राहुल गांधी लोकसभेत दाखल झाले. या विजयामुळे राहुल गांधी यांचे काँग्रेसवरील वर्चस्व पुन्हा प्रस्थापित होणार हा संकेतही याच सरत्या वर्षातील पक्षांतर्गत घडामोडींनी दिला. आता लोकसभेत त्यांच्यासोबत त्यांच्या भगिनीने, प्रियांका वढेरा यांनीही पदार्पण केले आहे. मजबूत विरोधी पक्षांची फळी सोबत असूनही आता राहुल गांधी यांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कारकीर्दीवर मान्यतेची मोहोर उमटविण्याची जबाबदारी नव्या वर्षावर सोपवून सरत्या वर्षाने निरोप घेतला आहे. राजकारणासोबत, समाजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या राजकीय घडामोडींचीही सरत्या वर्षाने नोंद करून ठेवली आहे. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना ही जगाच्या राजकीय पटलावरील कुतूहलाची बाब ठरली आहे. देशाची अर्थव्यवस्था, सामाजिक कल्याणाच्या योजना आणि पायाभूत सुविधांचा विकास अशा ऐतिहासिक प्रगतीची नोंद नव्या वर्षाच्या हाती देऊन सरत्या वर्षाने निरोप घेण्याची तयारी सुरू केली आहे. भारतीय दंडसंहितेच्या संकल्पनेचा ढांचा बदलून कायद्याला मानवतेचा स्पर्श देणारा न्याय संहिता अस्तित्वात आणणारा ऐतिहासिक क्षण सरत्या वर्षाने अनुभवला, सौरऊर्जेद्वारे घरादारांमध्ये प्रकाशाची नवी उधळण करणारी सूर्यघर योजना ही सरत्या वर्षाने भारताला दिलेली अनोखी देणगी ठरणार आहे. प्रत्येकाच्या माथ्यावर छप्पर देणाऱ्या महत्त्वाकांक्षी योजनेची पायाभरणीदेखील याच सरत्या वर्षात झाली आहे आणि संपूर्ण अपेक्षापूर्तीसाठी सामान्यांच्या नजरा नव्या वर्षावरच खिळल्या आहेत. मागे सरणाऱ्या प्रत्येक दिवसाने अशा अनोख्या आनंदाच्या असंख्य क्षणांची उधळण सामान्यांच्या मनावर केली आहे. या आनंदाचे लेणे सोबत घेऊन, तो द्विगुणित करण्याच्या बांधिलकीसह उद्या नव्या वर्षाचा पहिला दिवस उजाडेल. तसेच घडो, या शुभेच्छांसह सरत्या वर्षाला निरोप देऊया!

## आंतरराष्ट्रीय

# चीनच्या चतुरतेला भारताचे उत्तर

**वसंत गणेश काणे**

(पूर्वार्ध)

आशियातील जनतेचा पाश्चात्त्यांवर विश्वास नाही याबाबत आश्चर्य वाटायला नको. जवळजवळ पूर्ण आशियाला पाश्चात्त्यांनी गुलामासारखे वागवून येथील जनतेचे शोषण केले आहे, ही बाब विसरण्यासारखी नक्कीच नाही. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला की, आता स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चात्त्य देशांशी फटकून वागण्याची मानसिकता आशियन जनतेत निर्माण झाली, हेही समजण्यासारखेच आहे. आशियन देशांचाच एक गट तयार करावा आणि त्यांनीच आपापसात संबंध ठेवावेत, अशी मानसिकता निर्माण होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. 'आशियन सगळे एक, इतर सगळे परके', हा भावही यामुळेच निर्माण झाला. या भावनेने भारावून गेलेल्या आशियनांच्या मानसिकतेला आणखी खतपाणी घालण्याचा चतुर डाव चलाख चीनने आखला. चीनची भूमिका अशी होती की, आशियात आपल्याला आव्हान देण्याचे सामर्थ्य कुणातही नाही. त्यात भारतही आला. चीनचा आशियातील बहुतेक देशांशी सीमावाद आहे. हा वाद आम्ही आपापसात सोडवू 'इतरांनी' त्यात पडू नये, अशी भूमिका चीनने घेतली. एकटा भारत सोडला तर इतर देशांचे सामर्थ्य आपल्या तुलनेत टिकणारे नाही, हे चीन जाणून आहे. चीनच्या तुलनेत भारताचे सामर्थ्यही फारशी चिंता करावी, असे नाही आणि नजीकच्या भविष्यात भारतही चीनची बरोबरी करू शकणार नाही, अशीच चीनची समजूत होती आणि आहे. भारताबद्दल बोलायचे तर एकेकाळी पंचशीलच्या गारुडाने भारतही भारावून गेला होता. त्यातून भारताला बाहेर यायला १९६२ साल उजाडावे लागले. एप्रिल १९५४ मध्ये, भारत आणि चीनने पंचशील करारावर स्वाक्षरी केली होती. यालाच शांततापूर्ण सहअस्तित्वाची पाच तत्त्वे म्हणूनही ओळखले जाते. परस्परांच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा सन्मान करणे, परस्परांवर आक्रमण न करणे, एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे, समानतेवर आधारित व्यवहार करणे, परस्पर लाभ होईल असा व्यवहार करणे, आणि शांततापूर्ण सहअस्तित्वाचा पुरस्कार करणे अशा आशयाची या पंचशील कराराची तत्त्वे आहेत. मुळात बौद्ध धर्मानुसार सदाचाराची पाच तत्त्वे सांगितली आहेत. प्रत्येक धार्मिक व्यक्तीने त्यांचे पालन करावे, अशी बौद्ध धर्माची शिकवण आहे. (१) अस्तेय म्हणजे चोरी न करणे; (२) अहिंसा म्हणजे हिंसा न करणे, (३) ब्रह्मचर्य म्हणजे व्यभिचार न करणे, (४) सत्य म्हणजे खोटे न बोलणे आणि (५) मादक द्रव्यांचे सेवन न करणे अशा आशयाची ही पाच तत्त्वे आहेत. भारत आणि चीन यांनी करार करताना पंचशील हेच प्राचीन शीर्षक वापरून करार केला होता. हा करार करून भारताला बेसावध ठेवून चीनने सीमेवर कुरापती करायला सुरुवात केली आणि १९६२ मध्ये तर सरळसरळ आक्रमणच केले. भारत आपल्या तुलनेत कसा कमकुवत आहे, याची भारताबरोबरच जगालाही जाणीव करून देण्यासाठी केलेला हा चीनचा प्रयत्न होता. चीन फक्त भारताशीच असा वागतो, असे नाही. इतर बहुतेक देशांशीही चीनची वागणूक अशीच आहे.

### चीनने उकरून काढलेले सीमावाद

**भारत-चीन सीमावाद :** अक्साईचीनमधला चीनने ३८,००० चौ. किमी. भूभाग बळकावला आहे तर अरुणाचलमधील ९०,००० चौ. किमी. भागावर दावा सांगितला आहे. या शिवाय उत्तराखंडची ५४५ किलोमीटर लांबीची सीमा चीनला (तिबेट) लागून आहे. या भागात निरनिराळ्या ठिकाणी मिळून एकूण २४५० चौ.किमी. भूभाग चीनला हवा आहे.

**नेपाळ-चीन सीमावाद :** आज नेपाळ चीनच्या ताटाखालचे मांजर असल्यासारखे दिसत असले तरी चीनने नेपाळची घुसखोरी करून हडपलेली एकूण ६४ हेक्टर जागा ढोलाखा, हुमला, सिंधूपालचौक, संखुवासभा, गोरखा आणि रासुवा जिल्ह्यात विखुरलेली आहे. नेपाळ-चीन सीमा १४१५ किमी. लांब आहे. या सीमेवर ठिकठिकाणी पिलर्स लावलेले होते. यापैकी ९८ पिलर्स उखडून फेकण्यात आले आहेत तर इतर काही नेपाळच्या सीमेत आत सरकवण्यात आले आहेत. नेपाळी काँग्रेसने याबाबत नेपाळच्या संसदेत ठराव मांडून चीनने नेपाळची हडपलेली भूमी परत मिळविण्यास ओली सरकारला सांगितले. पण व्यर्थ. मे २०२० मध्ये चीनच्या ग्लोबल टेलिव्हिजन नेटवर्कने, माऊंट एव्हरेस्ट चीनच्या हद्दीत आहे, नेपाळच्या नव्हे, असे घोषित केले. नेपाळमध्ये संतापाची लाट उसळताच मात्र हे ट्विट डिलिट करण्यात आले. चीन आणि नेपाळमध्ये १७८८ ते १७९२ मध्ये युद्ध झाले होते. त्याचा हवाला देत ६४ हेक्टर जागेवर चीन आपला अधिकार सांगतो आहे.

**चीन-भूतान सीमावाद :** जुलै २०१७ मध्ये भूतानी अधिकाऱ्यांनी चिनी अधिकाऱ्यांना बजावले की, दोन देशांदरम्यान झालेल्या सहमतीला अनुसरून वागावे. डोकलाम प्रकरणानंतरही चीन भूतानच्या सीमेच्या आत निरनिराळ्या ठिकाणी घुसखोरी करीत असतो. भूतानी गुराख्यांना भूतानी प्रदेशातूनच चिनी गस्ती तुकड्यांनी अनेकदा हुसकून लावले आहे. चीनने भूतानच्या साकतेंग अभयारण्यावर दावा करून भारतालाही शह देण्याचा प्रयत्न केला आहे. दक्षिण चीन उपसागर आणि प्रशांत महासागरात चीनने जवळपास सर्व देशांशी सीमावाद उकरून वातावरण तापवले आहे. चीनचे तैवान, ब्रुनाई, इंडोनेशिया, मलायाशिया, फिलिपिन्स, व्हिएतनाम आणि जपानबरोबर सागरविषयक प्रश्नी वाद आणि संघर्ष आहेत. चीन समुद्रातील साधनसंपतीबाबत जुने पुराणे ऐतिहासिक दाखले दाखवत अधिकार गाजवण्याच्या प्रयत्नात असतो. दक्षिण चिनी समुद्र व त्यातील लहानमोठी बेटे, समुद्रात जेमतेम बुडालेली बेटे, किनारे यावर चीन आपला अधिकार गाजवत असतो.

**व्हिएतनाम :** १९७४ मध्ये चीनने पॅरसेल बेटे व्हिएतनामकडून हिसकावून घेतली. वूड आयलंड्सवर चीनने सैनिकी ठाणी उभारली, विमानतळ बांधले आणि कृत्रिम बेटे उभारली आहेत. या बेटांवर तसेच तैवान आणि व्हिएतनामधील प्रदेशांवरही चीन आपला अधिकार सांगत असतो.

**जपान :** पूर्व चिनी समुद्रात सेनकाकू नावाची निर्जन बेटे आहेत. चीनने याच बेटांना दिओयू बेटे अशी नावे दिली आहेत. १८९० पासून या बेटांवर जपानचे नियंत्रण आहे. १९७० मध्ये या बेटांवर खनिज तेलांचे मोठे साठे आहेत, हे कळताच चीनने या बेटांवर अधिकार सांगितला. अमेरिका आणि जपानने हा अधिकार नाकारताच चीनने प्रचंड प्रचार मोहीम राबवून त्यांना विवादित स्वरूप दिले.

**तैवान :** चीन तैवानवर आपला अधिकार सांगतो आहे. मॅक्लेसफील्ड बँक, पॅरसेल बेटे, स्कारबरो शोल, स्पार्टली बेटे यावरही चीन आपला अधिकार सांगतो आहे. या बेटांवर चीन, तैवान, व्हिएतनाम आणि म्यानमार हे देश आपलाही अधिकार आहेत, असे सांगत आहेत.

**फिलिपिन्स :** दक्षिण चिनी उपसागरावर फिलिपिन्स आणि चीन दोघेही आपला अधिकार सांगतात. फिलिपिन्सने हा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे नेला होता. या न्यायालयाने फिलिपिन्सच्या बाजूने निकाल दिला. पण हा निकाल चीनने मानला नाही.

स्कारबरो शोल हे बेट समुद्रात जेमतेम बाहेर आलेले बेट आहे. या बेटाबाबत १९९७ साली वाद सुरू झाला होता. तो शिगेला पोचला एप्रिल २०१२ मध्ये. शेवटी चीनने इथेही आपले बस्तान बसवलेच. शेवटी फिलिपिन्सने पीसीए (परमनंट कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन) कडे दाद मागून निर्णय आपल्या बाजूने मिळवला पण चीनने याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. चीनची ही चतुराई हाणून पाडण्यासाठी भारतानेही उपाय योजले आहेत. ते आपण पुढच्या भागात पाहू.

९४२२८०४४३०

## वेध

# महापुरुषांच्या नावांचा राजकारणासाठी 'गैरवापर'

**पुंडलिक आंबटकर**

लोकसभा निवडणुकीत सलग तीनवेळा दारुण पराभव झाल्याने काँग्रेसचे अस्तित्व डावावर लागले आहे. त्यामुळे या पक्षाने आता महापुरुषांच्या नावांनी राजकारण सुरू केले आहे. भावनिक मुद्दे उपस्थित करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न सध्या या पक्षाकडून सुरू आहे. परंतु, आधुनिक भारत भविष्याचा विचार करण्यास सक्षम असल्याने काँग्रेसची डाळ शिजण्याची शक्यता नाहीच. पराभवाचे शल्य पचवता न आल्याने आधी संविधान आणि नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने काँग्रेसने रान उठविले आहे. भाजपा संविधान मानतच नाही, असेही या पक्षाने सांगून पाहिले. परंतु, खऱ्या-खोट्यांतील भेद जाणणाऱ्या जनतेने विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आपली जागा दाखवून दिली.

संविधान आणि डॉ. आंबेडकरांबद्दल काँग्रेसला एवढाच आदर होता, तर निवडणुकीत त्यांना दोनदा हरविण्याचे पातक का केले? पंडित नेहरूंनी त्यांच्याविरोधात प्रचार का केला? अशा अनेक प्रश्नांची जनतेला उत्तरे हवी आहेत. काँग्रेसचे आंबेडकरप्रेम बेगडी आहे. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर तब्बल ३३ वर्षांनी भाजपा समर्थित व्ही. पी. सिंग सरकारने त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान बहाल केला. हा सन्मान त्यांना देण्याची गरज काँग्रेसला एकदाही वाटली नाही! पूर्वी देशातील मानाचे पुरस्कार केवळ चेलेचपाट्यांना आणि मर्जीतील लोकांनाच दिले जायचे. देशात मोदी पर्व सुरू होताच तळागाळातील आदिवासी आणि खऱ्याखुऱ्या गोरगरीब समाजसेवकांना पुरस्कृत करण्याचा पायंडा पडला. काँग्रेसने आजपर्यंत गोरगरिबांच्या भावनांचा वापर केवळ राजकारणासाठी केला आहे. भाजपा सरकारने मात्र या उपेक्षित समाजसेवकांचा प्रत्यक्ष गौरव करून दाखविला.

तत्कालीन कायदे मंत्री डॉ. आंबेडकरांनी जम्मू-काश्मीरसाठी ३७० कलमाचा मसुदा तयार करण्यास स्पष्ट नकार दिला होता. तरीही पंतप्रधान पंडित नेहरूंनी हे कलम देशावर लादले, हा डॉ. आंबेडकरांचा सन्मान होता का? एवढे पातक करूनही केवळ मतांच्या लाचारीसाठी आज काँग्रेस भाजपाला आंबेडकरविरोधी ठरवू पाहात आहे! भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना लोकसभेत काँग्रेसने वारंवार महात्मा गांधींच्या हत्येचा मुद्दा उपस्थित करून वातावरण नासवण्याचा प्रयत्न केला. अटलजींसारख्या संवेदनशील नेत्याला भावनिक मुद्दे उपस्थित करून मानसिक त्रास देण्यात आला. महात्मा गांधींना मारेकऱ्याने फक्त एकदाच मारले परंतु त्यांच्या विचारांची हत्या करून याच लोकांनी महात्मा गांधींची वारंवार हत्या केली! अवघ्या एका मताने सरकार पाडून सभागृहात अटलजींवर हसणाऱ्या काँगेसची आज पुरती दुर्दशा झाली आहे. वास्तविक महात्मा गांधींची काँग्रेस आणि आजच्या काँग्रेस पक्षाचा काहीच संबंध नाही; तरीही केवळ जनतेत सहानुभूती निर्माण करण्यासाठी सोनिया गांधी यांनी पुन्हा महात्मा गांधी आणि भाजपाचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकात आयोजित बैठकीत सहभागी होऊ न शकणाऱ्या सोनिया गांधींनी आपल्या पक्षाला पत्र लिहून भाजपा सरकारच्या काळात महात्मा गांधींचा वारसा धोक्यात आल्याचा आरोप केला आहे. महात्मा गांधींनी या लोकांकडे आपला वैचारिक वारसा सोपविला होता का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो. महात्मा गांधी काँग्रेसला आपली मालमत्ता वाटत आहे का? महात्मा गांधी संपूर्ण देशासाठी वंदनीय आहेत, यात दुमत असू शकत नाही. देशावर ६ दशके राज्य करतानाही महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत घडवता आला नाही! आता भाजपा महात्मा गांधींचे स्वप्न साकार करीत आहे, तर ही बाबही सहन होत नाही! महात्मा गांधींनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसच्या विसर्जनाचा प्रस्ताव ठेवला होता. तरीही केवळ सत्तेच्या लालसेपोटी त्यांच्या विचारांना मूठमाती दिली! आता पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आल्याने पुन्हा महात्मा गांधींच्या नावाने वातावरण नासवण्याचा डाव रचला जात आहे. ज्या मुस्लिमांच्या गठ्ठा मतांची वारंवार बेगमी केली त्यांना तरी ६० वर्षांच्या सत्ताकाळात तुम्ही न्याय देऊ शकलात का? मुस्लिमांच्या विकासासाठी कोणत्याच ठोस योजना राबविल्या नाही. केवळ कोरडी सहानुभूती दाखवून मुस्लिमांना वर्षानुवर्षे झुलवत ठेवले. या समाजाला काँग्रेसने केवळ पानटपऱ्या आणि भंगाराची दुकाने तेवढी दिलीत! आता भाजपा सरकारच्या लोकोपयोगी योजनांचा लाभ हिंदूंसह मुस्लिमांनाही मिळत आहे. राजकारण करण्यासाठी ठोस मुद्दाच नसल्याने हे लोक महापुरुषांची नावे पुढे करून आपले दुकान वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे.

९८८१७१६०२७


## इतस्ततः

# अदानी प्रकरणातील आरोप : अर्थ आणि अनर्थ

**दत्तात्रेय आंबुलकर**

२०२४ या मावळत्या वर्षाकडे मागे वळून पाहताना, भारतीय अर्थ आणि उद्योगविश्वासाठीही हे वर्ष काहीसे खळबळजनक ठरले. त्यातच अदानी उद्योगसमूहावरील विविध आरोपांचे अल्पकालीन परिणामही शेअर बाजारावर दिसून आले. त्यानिमित्ताने या सरत्या वर्षात अदानी समूहावरील आरोप आणि त्यामागचा अर्थ-अनर्थ या लेखातून उलगडला आहे. गेल्या महिन्यात अमेरिकेच्या वित्तीय क्षेत्रातील काही उच्चपदस्थांनी अदानी उद्योगसमूहावर ऊर्जा प्रकल्पांच्या कामासाठी फार मोठ्या प्रमाणावर लाच दिल्याचा आरोप केला व या आरोपांचे पडसाद आर्थिक-औद्योगिक क्षेत्रात व 'दलाल स्ट्रीट'पासून ते 'पार्लमेंट स्ट्रीट'वरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय संबंध स्तरावर उमटणे अपरिहार्य होते व झालेही तसेच. यासंदर्भात प्रकर्षाने पुढे आलेला मुद्दा म्हणजे, याप्रकरणी केवळ अदानी समूहच नव्हे, तर एका अर्थाने भारताचीच प्रतिष्ठा पणाला लागली. यातून भारताच्या सद्यःस्थितीतील जागतिक स्तरावरील प्रगतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याच्या जोडीलाच भारतीय कॉर्पोरेट कंपन्यांच्या व्यवहारांच्या संदर्भात पण वेगळ्या अर्थाने चर्चा होऊ लागली. या चर्चेचे काही परिणाम तातडीने दृश्य स्वरूपात दिसू लागले. या प्रकरणाचे तातडीने व जागतिक स्तरावर आणि मोठ्या प्रमाणात दिसून आलेले परिणाम म्हणजे, फ्रान्समधील विख्यात तेल उत्पादक कंपनी असणाऱ्या 'टोटल एनर्जी' या प्रख्यात कंपनीने अदानी उद्योग समूहावरील आर्थिक लाचखोरीची चर्चा सुरू होताच, जागतिक स्तरावर अदानी उद्योग समूहामध्ये त्यांच्यातर्फे करण्यात आलेली गुंतवणूक तातडीने रद्दबातल केली. यालाच जोडून केनियाचे राष्ट्राध्यक्ष विलियम रुटो यांनी अदानी उद्योगाला आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पुनर्निर्माणासह पुढील ३० वर्षांसाठी असणारे देखभालीचे प्रदीर्घ कंत्राट तडकाफडकी रद्दबातल केले. याशिवाय 'केनियन एनर्जी' कंपनीने 'अदानी एनर्जी'सह केलेला करार रद्द करण्यात आला.

त्याचदरम्यानच्या व्यावसायिकदृष्ट्या व अदानी उद्योगाच्या संदर्भात व विशेषतः मोठ्या आणि महत्त्वाच्या घडामोडी म्हणून अमेरिकेच्या 'यूएस इंटरनॅशनल डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन'ने अदानींच्या सहकार्यातून श्रीलंकेत बांधल्या जाणाऱ्या बंदर बांधणी प्रकल्पाच्या कामावर नव्याने व्यावसायिक प्रस्तावासह चर्चा सुरू केली. दुसरीकडे त्याचवेळी बांगलादेशमधील



काळजीवाहू सरकार म्हणून काम करणाऱ्या मोहम्मद युनूस यांच्या काळजीवाहू सरकारचे अदानी उद्योगासह करण्यात आलेल्या ऊर्जापुरवठा करारावर फेरविचार करण्यास सुरूवात केली. यानिमित्ताने आंतरराष्ट्रीय स्तरावर अदानी उद्योगातील ऊर्जा, बंदर विकास, विमानतळ बांधणी इ. संदर्भात ज्या देश वा त्या देशातील कंपन्यांनी जे मोठ्या प्रमाणावरील व्यवसायविषयक करार केले होते, त्यापैकी प्रामुख्याने टांझानिया, इस्रायल, ग्रीक, इंडोनेशिया, नेपाळ, व्हिएतनाम, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशातील महत्त्वाच्या व मोठ्या प्रकल्पांचे प्रस्ताव वा प्रत्यक्ष काम यावर व्यावसायिकदृष्ट्या नकारात्मक परिणाम दिसून आले. यातील महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये चार आंतरराष्ट्रीय विमानतळ, सहा बंदर-पोर्ट निर्माण व खाणकाम व धातूकाम क्षेत्रातील तीन मोठ्या प्रकल्पांचा समावेश असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. गेल्या काही वर्षांचा कानोसा घेता असे लक्षात येते की, अदानी उद्योग समूहाचे भारतातील खाजगी क्षेत्रातील एक प्रगत कंपनी म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर व भारत सरकारच्या धोरणानुरूप दक्षिण आशिया, आफ्रिका व अन्य देशांत वेगाने औद्योगिक प्रगती करीत आहे. असे करताना भारत सरकारच्या पूर्वेकडील देशांवर भर देण्याच्या धोरणाचे विशेषत्त्वाने पालन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने आज भारतातील बांधकाम व मूलभूत सुविधा विकास क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्या मध्य-पूर्वेतील देशांपासून, दक्षिण-पूर्व आशिया क्षेत्रात आपला व देशाचा नावलौकिक वाढवत आहेत.

या पृष्ठभूमीवर ठरावीक कालावधीनंतर आर्थिक-राजकीय संदर्भात विशेष घटनाक्रम लक्षात घेऊन ठरवून केल्याप्रमाणे अदानी उद्योगांवरील आंतरराष्ट्रीय स्तरावरील आरोपांचे बहुविध परिणाम व पडसाद उमटत असतात. सद्यःस्थितीत अशा आरोपांचे अदानींच्या संदर्भात व्यावसायिकच नव्हे, तर राजकीय संदर्भात राष्ट्रीय स्तरावर, तर व्यावसायिक संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर परिणाम स्पष्टपणे दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने संसदेतील अशा निदर्शनांपासून ग्रीस, ऑस्ट्रेलिया, टांझानिया इ. देशांनी व्यावसायिक पद्धतीने व आंतरराष्ट्रीय स्तरावर न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यापर्यंतचा समावेश करता येईल. याचे परिणाम भारतीय व्यापार-व्यवसाय क्षेत्रावर अपरिहार्यपणे होत जातात.

अदानी उद्योगसमूहावर करण्यात आलेल्या आरोपांमध्ये जागतिक स्तरावरील सर्वांत मोठ्या व्यवहारांपैकी एक अशा सौरऊर्जा व्यवहारांच्या संदर्भात अदानी उद्योग समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर अमेरिकन उद्योग-व्यवसाय क्षेत्रातर्फे वैयक्तिक स्तरावर जे आरोप करण्यात आले, त्याला भारतीय संसदेच्या हिवाळी अधिवेशनाची सुरुवात होण्याची राजकीय पृष्ठभूमी लाभल्याचा योग पुन्हा जुळून आला. व्यावसायिक तपशिलासह थोडक्यात सांगायचे म्हणजे, सौरऊर्जा क्षेत्रातील मोठ्या म्हणजेच १२ गिगावॅट तंत्रज्ञान पद्धतीवर आधारित ऊर्जानिर्मितीसाठी अदानी ऊर्जा उद्योग व 'अ‍ॅझ्युअर पॉवर' या ऊर्जा क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांतर्फे आवश्यक त्या उपकरणांची उत्पादन निर्मिती व त्यांच्याच उपयोगांद्वारे ऊर्जानिर्मितीचे जागतिक स्तरावरील महत्त्वाच्या व मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध झाली होती. अशा या महत्त्वाच्या प्रकल्पाचे व्यवहार, कागदपत्रे व निर्णयपद्धती या साऱ्यांवर आरोपांसह आक्षेप घेण्यात आले व त्याचा परिणाम भारतीय ऊर्जाक्षेत्राशी प्रामुख्याने संबंधित असणाऱ्या 'सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया', 'नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन' व इतर काही कंपन्यांवर झाले आहेत. आपल्या व्यावसायिक व्यवहाराच्या संदर्भात अदानी ऊर्जा कंपनीने प्रामुख्याने नमूद केलेली बाब म्हणजे, ऊर्जा क्षेत्रात उपकरणांचे उत्पादन व प्रकल्प व्यवस्थापन व त्याच्या क्रियान्वयनाद्वारे प्रत्यक्ष वीजवितरण अशी सेवा जागतिक स्तरावर देणाऱ्या मोजक्याच कंपन्या असून, त्यामध्ये अदानी-अ‍ॅझ्युअर एनर्जीचा संयुक्त प्रकल्प प्रस्ताव अव्वल व म्हणूनच स्वीकार्ह ठरणार होता. या एकमेव व महत्त्वाच्या मुद्द्यावरूनच गौतम अदानींनी त्यांच्यासह त्यांच्या कंपनीवर करण्यात आलेले आरोप खोडून काढले आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### सीताबर्डीत नागरिकांना कधी मिळेल मोकळा मार्ग?

३० डिसेंबरच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचली. व्हेरायटी चौक ते लोखंडी पूलपर्यंत मार्ग रुंद केल्यानंतरही वाहनचालकांना व पायी जाणाऱ्यांना बराच त्रास सहन करावा लागतो. येथील अतिक्रमण हटवण्यासाठी अनेकदा प्रयत्न झाले; मात्र अद्याप कोणालाही यश आले नाही. येथील अतिक्रमणधारकांची प्रचंड दादागिरी वाढली आहे. कधी हटेल अतिक्रमण आणि कधी हा मार्ग मोकळा होईल, याकडे नागपूरकरांचे लक्ष लागले आहे. हे अतिक्रमण हटविण्यासाठी खालील उपाययोजना करावी असे वाटते.

सर्वप्रथम या मार्गावरून कोणत्याही वाहनाला परवानगी नसावी. या मार्गावरून पायी चालणे प्रत्येकाला सहज शक्य आहे. रस्त्यावर दुकान लावून उदरनिर्वाह करण्याची संख्या अधिक असल्यामुळे दुकानांसाठी जमिनीवरील जागा कमी पडत आहे, असे दिसते. त्यामुळे या दुकानदारांसाठी मल्टीस्टोरीड दुकाने बांधून ती त्यांना भाडेतत्त्वावर देण्यात यावी. मनपाला हे सहज शक्य आहे. असे केल्याने याच मार्गावर दुकानदारांना दुकाने मिळतील, म्हणजे त्यांचा व्यवसाय सुरू राहील तसेच रस्त्यावरील गर्दी कमी होऊन मनपाला दुकानदारांकडून उत्पन्नही मिळेल. ही दुकाने अपना बाजार भागात बांधण्यात यावी म्हणजे किरकोळ दुकानदारांचा बाजार एकत्रितपणे या मार्गाच्या मध्ये येईल आणि अतिक्रमणाचा प्रश्न सुटेल.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस

गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये एक नाव प्रामुख्याने वारंवार येत आहे, ते म्हणजे जॉर्ज सोरोस. हा एक अमेरिकन उद्योगपती आहे. आतापर्यंत जे काही वाचण्यात आले, त्यावरून या माणसाचे उद्योग म्हणजे जगभरात अराजकता निर्माण करणे, लोकशाही पद्धतीने सत्तेवर आलेली सरकारे उलथवून तिथे स्वतःच्या पसंतीचे बुजगावणे बसविणे व त्यांच्याकडून स्वतःला लाभकारक निर्णय करवून घेणे, हे आहेत. त्यातल्या त्यात संबंधित देशांतील फुटीरवादी मंडळी हाताशी धरून आणि त्यांना पैशांची भरघोस मदत करून देशविरोधी कारवाया घडवून आणायच्या आणि अराजक निर्माण करायचे.

ही पृष्ठभूमी पाहता, सद्सदविवेक जागृत असणाऱ्या कोणत्याही नागरिकाने अशा व्यक्तीशी कसलाही संबंध ठेवला नसता. पण, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी या त्याच्याशी घनिष्ठ संबंध ठेवतात. त्याच्या संस्थेत जबाबदारीची पदे स्वीकारतात. एवढेच नव्हे तर, त्याच्या कार्यक्रमांनुसार स्वतःच्या पक्षाची धोरणे आखतात आणि भूमिका घेतात. थोडक्यात, स्वतःची अक्कल गहाण ठेवून संपूर्ण देशाला वेठीला धरण्याचे उद्योग करतात. अशा वृत्तीला काय म्हणावे? ठीक आहे, त्या तर बोलून-चालून विदेशी मुळाच्याच आहेत. पण इतर ज्येष्ठ काँग्रेसी नेत्यांचे काय? त्यांना तर देशाचे बरे-वाईट कळते ना? काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, अशी शेखी मिरवणारे हे सर्व नेते राजमातेच्या चरणी माथा टेकवून स्वतःची अस्मिता गहाण ठेवल्यासारखे वागतात, तेव्हा मात्र कीव नव्हे, चीड येते. बरं, यांचा ५५ वर्षीय 'युवा नेता'! त्याच्याबद्दल काय म्हणावे? हा कायम बालपणातच जगतो. कुठे काय बोलावे किंवा बोलू नये, हेही त्याला कळत नाही. एखादा लहान मुलगादेखील आपल्या घरातल्या गोष्टी बाहेर सांगत नाही. पण, हा माणूस मात्र जगभर स्वतःच्या देशाविरुद्ध बोलत असतो. म्हणजे जॉर्ज सोरोसच्या हातचे बाहुलेच आहे.

**चारुदत्त शेंडे**/९४२२३१५३१८

### त्यागाचा आदर व्हावा तरच जीवन सफल होते

ओंजळभर सुखासाठी विश्वाइतका पदर पसरणारी आई आणि त्या पदराला सामर्थ्याचा हात देणारा पुरुष अर्थात् वडील यांच्या त्यागाचा आदर करायला नवीन पिढी मागे का पडते आहे? आई-वडिलांच्या कष्टांना आणि प्रेमाला कमी समजणारे स्वतःचे अस्तित्वच विसरायला लागले आहेत. तुम्ही आमच्यासाठी काय केले? हा हृदयस्पर्शी प्रश्न काळीज कापून टाकतो. मैत्रिणींना हजारो रुपयांची पार्टी आणि दारू देण्यापेक्षा आई-वडिलांनी आपल्याला शिक्षण देऊन नोकरीयोग्य बनविले, त्याचे उपकार मानण्याचे प्रयत्न करावे. खोटा आव आणून जगाला श्रीमंती दाखवून, आई-वडिलांच्या नावे कर्ज घेऊन त्यांना वृद्धाश्रमात ठेवून मारू नका. आईचे जीवन दूध, दही, ताक, लोणी, तूप या पंचतत्त्वाने बनलेले असते. जेवलास का? झोपलास? काही दुखते का? हे प्रश्न विचारणाऱ्या मायेच्या, काळजीच्या आणि कोमल स्वरांना लुप्त करून जीवन आनंदी होत नाही. आई शब्दात जीव असतो, बाबा शब्दात जाणीव असते, ताई शब्दात मान असतो, दादा शब्दात वचक असतो, मित्र शब्दात शान असते, अंत शब्दात खंत असते, भिंत शब्दात जिवंतपणा असतो, गुरू शब्दात अर्थ असतो, अ ते ज्ञ बाराखडीत इंग्रजीपेक्षा ज्ञानाचे भांडार असते; म्हणूनच त्यागाचा आदर करून जीवन सफल बनविण्याचा नवीन पिढीने प्रयत्न करायला हवा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### मोबाईलसाठी मुलाने केली आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील केदार वस्ती येथील अक्षय हनमंत तिडके या १८ वर्षीय मुलाने मोबाईल का घेत नाहीत म्हणून रागाच्या भारात फवारणीचे विषारी औषध प्राशन करीत आत्महत्याा केली.

पाथरी पोलिस ठाण्यात हनमंत तिडके यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे मुलाने १४ डिसेंबर रोजी हे कृत्या केले. त्याावर उपचाराकरीता छत्रपती संभाजी नगरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचार सुरु असतांना मुलाचा मृत्यूा झाल्याचे नमूद केले. दरम्यान, पाथरी पोलिसांनी या प्रकरणात आकस्मात मृत्यूाची नोंद केली आहे.

### जमजम कॉलनीतन ८० हजारांची रोकड लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील जमजम कॉलनीतील एका निवास्थानातून अज्ञात चोरट्यांनी ८० हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली.

शेख इरफान यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्याद्वारे २५ डिसेंबर रोजी सायंकाळी आपण सासरवाडीस गेलो असतांना अज्ञात चोरट्यांनी घरातील अलमारीचे कुलूप तोडून रोख ८० हजार रुपये, एटीएम कार्डसह अन्य वस्तू पळविल्याचे नमूद केले. दरम्यान, या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### भाजपाद्वारे दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प

**परभणी,/प्रतिनिधी :** सदस्य नोंदणी अभियानातून या जिल्ह्यात नवीन दोन लाख सदस्य नोंदणीचा संकल्प भारतीय जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी निरीक्षकांसह संघटनमंत्र्यांसमोर सोडला.

सदस्य नोंदणीच्या पार्श्वभूमीवर येथील आयएमएच्या सभागृहात शनिवार २८ डिसेंबर रोजी जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, तसेच प्रदेश सचिव राहुल लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, प्रदेश प्रवक्ते डॉ. उमेश देशमुख, जिल्हा महामंत्री सुभाष आंबट, डॉ. केदार खटींग, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, विलास बाबर, शिवाजीराव मव्हाळे, शशिकांत देशपांडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रत्योक पदाधिकाऱ्याने या जिल्ह्यात सदस्य नोंदणीचे अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी करण्याचा संकल्प सोडला. लोकसभा, विधानसभा निवडणूकीत भाजप व इतर मित्रपक्षांना पूरक असे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून सदस्य नोंदणीकरीता निश्चितच सर्वार्थाने प्रयत करावेत, असे आवाहनसुध्दा यावेळी मान्यवरांनी केले.

### लंगोटे करणार रस्ते कामासाठी उपोषण

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनी ते स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे काम महापालिका प्रशासनाने तात्काळ सुरु करावे, अन्यथा आपण १ जानेवारीपासून बेमुदत उपोषणास बसू, असा इशारा माजी नगरसेवक विकास प्रभाकरराव लंगोटे यांनी दिला आहे.

या रस्त्याची अवस्था भयावह आहे. तरीसुध्दा या रस्त्याावरुन आदळआपट करीत स्त्री रुग्णालयाकडे जाणारे रुग्ण व त्याांचे नातेवाईक मोठ्या यातना सहन करत आहेत. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, मुन्सिपल कॉलनी, संजय गांधी नगर, बँक कॉलनी, अजमेर कॉलनी, सुभेदार नगर, मंगेश नगर, डॉ. अब्दुल कलाम नगर, जावई कॉलनी, सालासार नगर या भागातील नागरीकांनाही ये-जा करण्याकरीता हाच रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्याावर ये जा करतांना नरक यातना भोगल्याशिवाय कोणताही पर्याय नागरीकांसमोर नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या रस्त्याच्या दुरावस्थेसह या रस्त्याावरील दुतर्फा अतिक्रमणे ओळखून तात्काळ कारवाई सुरु करावी, अशी अपेक्षा माजी नगरसेवक लंगोटे यांनी व्यक्त केली.

### धर्मापूरी जि.प. शाळेत रतन टाटा यांची जयंती

**परभणी,/प्रतिनिधी :** धर्मापूरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवारी (दि.२८) शालेय परिपाठात आजचा दिनविशेष या सदरात रतन टाटा यांची जयंती साजरी करण्यात आली. 'आजचा आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत सृजनशीलतेचा विकास आणि सृजनशीलतेचा आनंद मिळावा म्हणून रतन टाटा यांचे जयंतीचे औचित्या साधून सामान्य ज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक वैद्य तर प्रमुख वक्ते तथा मार्गदर्शक म्हणून शिक्षक अनिल बसुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुरलीधर खेडकर व श्रीमती विमल धंदर यांची उपस्थिती होती. सुरुवातीस प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेचे भाषा शिक्षक डी. एस. फुलवरे यांनी प्रस्तावना केली. नारायण वैद्य यांनी 'जिंदगी के सफर में गुजर जाते है जो मकाम' हे गीत रतन टाटांना समर्पित केले. प्रमुख मार्गदर्शक अनिल बसुळे यांनी रतन टाटा यांचे संपूर्ण जीवन त्याांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्याांची देशभक्ती त्याांचा तो कणखरपणा, नम्रपणा, नैतिकता जागतिक स्तरावरचे उद्योगातील नेतृत्व, अपमानातून यशात रूपांतर, त्याांनी केलेलं शैक्षणिक कार्य, सामाजिक दातृत्व या सर्व बाबींचा उलगडा विद्यार्थ्यांसमोर केला. श्रीमती विमल धंदर यांनी त्याांच्या विचारांवर प्रकाश टाकला. भटक्या कुत्र्याबाबतचा त्याांचा दृष्टिकोन, वंचिताबद्दलचे सामाजिक उपक्रम, करुणा, परोपकार इत्यादी गुणांबद्दल विद्यार्थ्यांना त्याांनी सखोल माहिती दिली.

फुलवरे यांनी अनामवीरा ही कुसुमाग्रजांची कविता रतन टाटा यांना समर्पित केली. ज्याप्रमाणे एक ज्ञात आणि अज्ञात सैनिक आपल्या देशाच्या संरक्षण करतो त्याचप्रमाणे रतन टाटा यांनी सर्वच क्षेत्रात आपले योगदान सिद्ध केले आहे. अनाम वीरा या कवितेतून त्याबद्दलचा भाव व्यक्त होतो. रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मु. अ. सय्यद सलीम, मुरलीधर खेडकर, नारायण वैद्य, देवानंद फुलवरे, अनिल बसुळे, श्रीमती सुरेखा शिंदे, श्रीमती श्रुतिका धुमाळ, श्रीमती रूपाली लोलगे, विमल धंदर आदींनी परिश्रम घेतले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रूग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# त्या दोन्हीही कुटुंबीयांना शासनाकडून निश्चितच मदत: आठवले यांचे आश्वासन

**परभणी ,/प्रतिनिधी:-** केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीतील दिवंगत लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. दोन्ही कुटुंबांना शासनाच्यावतीने निश्चितपणे मदत केली जाईल, अशी ग्वाही त्याांनी यावेळी दिली.

श्री. आठवले यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांकडून त्याांची व्यथा जाणून घेतली. परभणीत घडलेली घटना ही दुर्दैवी आहे. या प्रकरणाची पारदर्शकपणे सखोल चौकशी व्हावी व दोषींवर कार्यवाई करण्यात यावी, यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत. शासन हे सूर्यवंशी कुटुंबीयांच्या पाठीशी असून त्याांना सर्वोतोपरी मदत केल्या जाईल. असे श्री. आठवले यांनी यावेळी सांगितले.

आंबेडकरी चळवळीतील दिवंगत लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांची त्याांच्या राहुलनगर स्थित घरी जावून श्री. आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली. समाजासाठी तळमळीने काम करणारा एक चांगला लोकनेता जिल्ह्याने गमावला आहे. त्याांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीला मोठा धक्का बसला आहे. त्याांच्या स्मारकासाठी निश्चितपणे प्रयत केले जातील, असे श्री. आठवले यांनी याप्रसंगी सांगितले.

दरम्यान, शासकीय विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत श्री. आठवले यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी आणि अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांच्याकडून घटनेचा व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा



ढालकरी, उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे उपस्थित होते.

## उत्कर्ष विद्यालयात रामायण महाकाव्य नाटिका मोठ्या उत्साहात संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील श्रीराम प्रतिष्ठान सूरभी महोत्सव २०२४ अंतर्गत उत्कर्ष विद्यालयात रामायण महाकाव्य नाटिका मोठ्या उत्साहात संपन्न झाली या नाटिकेत विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

आपल्या अंगी असलेले सुप्त गुण दाखवून प्रेक्षकांची प्रमुख पाहुण्यांची मने जिंकली ही नाटिका पाहत असताना आपण राम युगात आहोत इतका प्रामाणिक प्रयत विध्यार्थ्यांनी नाटिका सादर करते वेळस केला. सर्वांना राम युगाची आठवण करून दिली.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, नटराज व छत्रपती शिवरायांच्या पूजनाने करण्यात आली. या महाकाव्य सोहळ्यास उद्घाटक म्हणून माजी आमदार हरिभाऊ लहाने, श्रीराम प्रतिष्ठानच्या सचिव



डॉ. सविताताई रोडगे तसेच सत्कारमूर्ती आमदार राजेश विटेकर (पाथरी विधानसभा), सचिन मगर, दादासाहेब टेंगसे , रामराव बोबडे,दिलीप डासाळकर ,निशिकांत पाटील, श्री रामेश्वर गायकवाड ,डॉ. प्रताप शिंदे,डॉ. दिगंबर घोडके, मंचक अचाने, डॉ. राजेंद्र गात, अँड. जी एच साडेगावकर माननीय संदीप टाक माननीय श्री गुलाबराव ताठे, श्रीराम प्रतिष्ठानचे प्रशासकिय अधिकारी प्रा. महादेव साबळे, मुख्याध्यापक कैलाश ताठे, हरिभाऊ कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. रामायण नाटिका प्रसंग दाखवण्यात आले त्यामध्ये राम, सीता, लक्ष्मण वनवासाला निघाल्यानंतर अयोध्यावासीयांच्या भावनांचा उठलेला कल्लोळ...अन् हनुमानाच्या भेटीपासून ते सीतेची लंकेतून सुटका करीत रावणाच्या वधापर्यंत, एक, दोन नव्हे तर गीतरामायणातील तब्बल २० प्रसंग, नृत्या, नाट्य व संगीताच्या माध्यमातून उत्कर्ष विद्यालय व ज्ञानतीर्थ माध्यमिक शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अवघ्या दीड तासात उलगडले ! ही नाटिका पाहून समोर बसलेल्या प्रेक्षकांची दाद मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना मिळाली तसेच त्याांचे भरभरून कौतुक करण्यात आले मान्यवरांनी देखील शाबासकीची थाप त्याांच्या पाठीवरती दिली व रामायण महाकाव्य मोठ्या उत्साहात या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतल्या चिमुकल्यांनी केले त्याांना मार्गदर्शन दिगंबर टाके, संदीप आकात यांनी केले.

## त्या रस्त्याच्या कामाची निविदा निघणार- लंगोटे

**परभणी,/प्रतिनिधी-** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयापासून स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या निविदा लवकरच निघणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली असून त्यामुळे आपण नियोजित आंदोलन तूर्त स्थगित करीत आहोत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे महानगर कार्याध्यक्ष तथा माजी नगरसेवक विकास लंगोटे यांनी दिली.

लंगोटे यांनी ९ डिसेंबर रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक धैर्यशील जाधव यांना या रस्त्याच्या दुरावस्थे संदर्भात निवेदन दिले होते, त्याद्वारे रस्त्याचे काम मार्गी न लागल्यास नवीन वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे १ जानेवारी २०२५ पासून प्रभागातील नागरिकांसहित आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता.या निवेदनाची दखल घेऊन महापालिकेचे शहर अभियंता यांनी या रस्त्याच्या कामाला शासनाची मंजुरी आली आहे, प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली असून लवकरच निविदा प्रक्रिया करण्यात येऊन हे काम चालू करण्यात येणार आहे. त्यामुळे आपण आपल्या मार्फत करण्यात येणारे उपोषण रद्द करून प्रशासनास सहकार्य करावे, अशा आशयाचे पत्र लंगोटे यांना दिले आहे. त्यामुळे आपण नियोजित आंदोलन तूर्त स्थगित करीत आहोत, असे लंगोटे यांनी म्हटले.

दरम्यान, यावेळी शहर अभियंता ठोंबरे, बांधकाम विभाग प्रमुख वसीम खान पठाण, माजी नगरसेवक विकास लंगोटे, राष्ट्रवादी युवकचे शहर उपाध्यक्ष दत्ता सवंडकर, अमीन भाई, रौफ भाई अन्सारी, गजानन मोरे, कदम आण्णा, तय्यब भाई, गौतम शिंदे, अतिक भाई, कलीम भाई आदी प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## जिंतूरात ७ जानेवारीला श्रीगौरी सावंत यांचे व्याख्यान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुका मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्पण दिनाचे औचित्या साधून ७ जानेवारी रोजी संध्याकाळी सहा वाजता शहरातील भाजी मंडई परिसरातील कन्या प्रशाला मैदानात आंतरराष्ट्रीय व्याख्यात्याा श्रीगौरी सावंत यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दर्पण दिनानिमित्त ६ जानेवारी रोजी पत्रकार भवनामध्ये ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान, पत्रकारांना विम्याचे, भेटवस्तूचे वाटप तर ७ जानेवारी रोजी श्रीगौरी सावंत यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी जीवन बेनिवाल, श्री तुळजाभवानी साखर कारखान्याच्या चेअरमन भावना बोर्डीकर, सुंदरलाल सावजी अर्बन बँकेचे चेअरमन मुकुंद सावजी कळमकर, ज्येष्ठ विधीज्ञ अशोक सोनी, ब्रिजगोपाल तोष्णीवाल, अॅड. मनोज सारडा, माजी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमांमध्ये पत्रकारितेला ज्यांनी संपूर्ण आयुष्य वाहिले आहे, असे पत्रकार एम. ए. माजिद, निहाल अहेमद यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, तालुक्याला तब्बल ४० वर्षानंतर मंत्रिपद मिळाले असल्यामुळे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.



परभणी-महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री ना.मेघना बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून मौजे अंबरवाडी गावातील विविध विकास कामाचे भूमीपूजन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती गंगाधर बोर्डीकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामराव घुगे, शामसुंदर मस्के, विकास जाधव अंबरवाडीकर, पुरुषोत्तम पाटील, नारायणराव घुगे, प्रभू जाधव, गजानन काळे, प्रदीप जाधव, लक्ष्मणराव घुगे, विष्णू काळे, दिगंबर घुगे, अमोल घुगे, ऋषी घुगे, सुनील घुगे,रवी घुगे,फकीरा बोडखे, शिवप्रसाद काळे दिसत आहेत.

## मतदारसंघातील लोकांच्या प्रेम, स्नेहाचे ऋण फेडणे अशक्य - आ.डॉ.गुट्टे; इसाद येथे नागरी सत्कार : जुन्या आठवणींना उजाळा

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** यंदाची निवडणूक फार निर्णायक होती. त्यामध्ये आपले गाव माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. त्यामुळे या विजयात आपलाही वाटा आहे. तसे बघितले तर हा केवळ माझ्या एकट्याचा नव्हे, तर मतदारसंघातील प्रत्योक व्यक्तीचा विजय आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. तरीही गावोगावी स्थानिक लोक मोठ्या आपुलकीने सत्कार करीत आहेत. यापूर्वीचे कामांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी सदिच्छा देत आहेत. त्यामुळे दररोज आपण भावनिक होत असून मतदारसंघातील लोकांच्या प्रेम, स्नेहाचे ऋण फेडणे अशक्य आहे, असे भावुक प्रतिपादन स्थानिक आ.डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.

तालुक्यातील मौजे.इसाद येथील छत्रपती शिवाजी चौकात आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी सलग दुसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल आ.डॉ.गुट्टे यांचा रासप, मित्रमंडळ आणि सर्व ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ



देवून जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी, आ.डॉ.गुट्टे यांची घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाचे औचित्या साधून आ.डॉ.गुट्टे गावातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी त्याांना मल्हार ग्रुपच्या वतीने काठी आणि घोंगडी देवून सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, आपल्या मतदारसंघाच्या चौफेर विकासाची भूमिका घेवून पुढे जायचे आहे. तुमच्या सर्वांच्या सोबतीने विकासाचे राजकारण करायचे आहे. त्यामुळे निवडणूक काळातले प्रसंग व घटना सोडून द्या. आपापसातील मतभेद दूर करा. शेवटी आपल्या भागाचा विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे मधल्या काळात जे झालं ते विसरून मतदारसंघातील गावोगावी सर्वांनी एकत्र यायला हवे. कारण, सर्वांच्या साथीने विकासाला नवी दिशा व चालना मिळत असते. म्हणून झालं गेलं विसरून कामाला लागा. तसेच आपापल्या गावच्या व परिसराच्या समस्या, अडचणी व प्रश्न माझ्या निर्देशनास आणून द्या. तसे झाले तर आपल्या मतदारसंघात प्रश्न, समस्या, अडचणी शिल्लक राहाणार नाहीत. त्यामुळे सर्वांना एकजूट व्हा आणि आपल्या गावाचा व परिसराचा विकास करता येईल, याकडे विशेष लक्ष द्या. कारण, गाखेड हा माझ्यासाठी केवळ विधानसभा मतदारसंघ नसून माझा परिवार आहे.

आपल्या मतदारसंघातील प्रत्योक गावात माझा उत्तम संपर्क आहे. प्रत्योकाला मी भेटत असतो. त्यांचे प्रश्न व अडचणी दूर करीत असतो. त्यातून मलाच समाधान मिळते. सर्वसामान्य लोकांची व्यक्तीगत कामांसह सार्वजनिक कामेही मार्गी लावल्यामुळे त्यांना माझ्या विषयी आदर आणि आपुलकी आहे. तशी आपुलकी आपल्या गावानेही वेळोवेळी दाखवून दिली आहे. त्यामुळे हेच प्रेम, माया, आपुलकी आणि विश्वास कायम असू द्या. कारण, हे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे नाते जपण्याचा मी सुध्दा प्रामाणिक प्रयत करणार आहे. तसेच येत्याा काळात आपल्या मतदारसंघात सुविधांची समृद्धी निर्माण करण्यासाठी कटिबध्द आहे. तसेच निवडणूक प्रचाराच्या दरम्यान दिलेली सर्व आश्वासने आणि शब्द पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम सुध्दा करणार आहे, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक किशनराव भोसले यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष रामप्रसाद सातपुते यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर सातपुते यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वसमत शहरातील अतिक्रमणांची उपविभागीय अधिकाऱ्यांकडून पाहणी

## वसमत व्यापारी संघटनेकडून अतिक्रमण हटविण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३१ डिसेंबर.**

शहरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असून या अतिक्रमणांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी व्यापारी संघटनेकडून करण्यात आल्यानंतर वसमतच्या प्रभारी उपविभागीय अधिकारी शारदा दळवी यांनी शहरातील अतिक्रमणांची पाहणी करीत नगर पालिका प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

वसमत शहरात मुख्य रस्ते तसेच बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले आहे. कुठे पक्के बांधकाम तर कुठे टिनशेड उभारून अतिक्रमण करण्यात आल्याचे दिसत आहे. या अतिक्रमणामुळे वाहतुकीस दररोज अडथळा निर्माण होत असून प्रशासनाने तातडीने अतिक्रमण धारकांवर कारवाई करावी तसेच अतिक्रमणे हटविण्यात यावी अशी मागणी व्यापारी संघटनेचे राजू लालपोतू, दिपक कुलथे, वसंत चेपूरवार, पांडुरंग दलाल, सीताराम म्यानेवार, राजेश सोनी, कांतीलाल बावले, गणेश काळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी प्रभारी उपविभागीय अधिकारी शारदा दळवी यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले.

शारदा दळवी यांनी वसमत शहरात पाहणी केली. यावेळी ठिकठिकाणी झालेले अतिक्रमण, अस्ताव्यस्त उभी करण्यात आलेली वाहने, उघड्यावरील मांसविक्रीची दुकाने, काही ठिकाणी टीनपत्रे ठोकून उभे केलेले अतिक्रमण पाहून दळवी चांगल्याच संतापल्या. शहरात अतिक्रमण होतांना नगर पालिका प्रशासन झोप घेत होते काय असा सवाल त्यांनी केला. कुठल्याही परिस्थितीत तातडीने अतिक्रमण हटवावे अशा सूचना त्यांनी नगर पालिकेला दिल्या. तसेच उघड्यावरील मांसविक्रीच्या दुकानांचा बंदोबस्त करावा, राष्ट्रीय महामार्गावर झालेले अतिक्रमण काढून टाकावे अन्यथा अतिक्रमणधारकांवर कायदेशीर कारवाई करावी अशा स्पष्ट सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या आहेत. त्यानुसार प्रशासनाने आता अतिक्रमण काढण्याची तयारी केली असून त्यासाठी पथकेही स्थापन करण्यात आली आहेत.

# पोलिसांकडून २५ लाख २२ हजारांचा मुद्देमाल फिर्यादीस परत

## सोन्याचांदीचे दागिने, वाहनांचा समावेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून हिंगोली जिल्हा घटकातील पोलिस ठाण्यांतर्गत गुन्ह्यातील आरोपींकडून हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याची मोहीत राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने पोलिस विभागाने दि ३१ डिसेंबर रोजी २५ लाख २२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल फिर्यादींना सन्मानपूर्वक परत केला आहे.

हिंगोली पोलिस दलाच्यावतीने मागील अनेक महिन्यांपासून गुन्ह्यातील आरोपींकडून हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादींना सन्मानपूर्वक परत केल्या जात आहे. दि ३१ डिसेंबर रोजी हिंगोली जिल्हा घटकातील सर्व पोलिस ठाण्यात ही मोहीम राबविण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील एकूण दोन गुन्ह्यातील सोन्या चांदीचे दागिने आणि नगदी असे १ लाख ३३ हजार रूपये तसेच १६ वाहने ज्यांची किंमत १६ लाख २८ हजार रूपये तर ५३ मोबाईल ज्यांची किंमत ७ लाख ६१ हजार रूपये असा एकूण २५ लाख २२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल विविध पोलिस ठाण्याअंतर्गत फिर्यादींना सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे.

पोलिस विभागाने या मोहीमेंअंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यात ७७ लाख ७७ हजार रूपयांचा मुद्देमाल फिर्यादीना परत केला आहे. या मोहीमेमुळे फिर्यादींनी समाधान व्यक्त केले आहे.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिकगुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोह प्रेमदास चव्हाण, सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी तसेच मुद्देमाल मोहरील यांनी बजावली आहे.

# शिवाजी महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे ३० डिसेंबर २०२४ रोजी कै. एकनाथराव पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ भारतीय लोकशाही साठी सद्याची निवडणूक प्रक्रिया - योग्य/अयोग्य. या विषयावर आंतर-महाविद्यालयीन वाद -विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. वाद-विवाद स्पर्धेच्या अध्यक्ष स्थानी मा. शिवाजी एकनाथराव पवार (निवृत्त शिक्षणाधिकारी ) हे होते तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ मंदाताई शिवाजीराव पवार ह्या होत्या तसेच विचारमंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्षिरसागर बी.एस.हे होते तर परीक्षक म्हणून बा.पु. गायकर आणि प्रा.सौ. डॉ.मनिषा गवळी उपस्थित होत्या. ही स्पर्धा वरिष्ठ आणि कनिष्ठ गटामध्ये होती. या स्पर्धेत अनेक महाविद्यालयाने भाग घेतला होता. वरिष्ठ विभागामधून मॉडेल कॉलेज हिंगोलीला प्रथम पारितोषिक, द्वितीय पारीतोषिक शिवाजी महाविद्यालय हिंगोलीला मिळाले तर कनिष्ठ विभागामध्ये ही शिवाजी महाविद्यालयाचे वर्चस्व राहिले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा धाराशिव शिराळे यांनी केले तर प्रा डॉ.बप्पा जाधव यांनी स्पर्धेच्या वेळेचे व्यवस्थापण केले आणि शेवटी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. या वेळी स्पर्धेचे संयोजक प्रा. डॉ. सुभाष शेरकर, प्रा. सौ. डॉ. सुनंदा भुसारे, प्रा सौ.प्रियंका पवार. प्रा.डॉ. रामभाऊ भाकरे व सुभाष जारे आणि उत्तम खिलारे मामा यांनी कार्यक्रम यशस्वीत्यासाठी परिश्रम घेतले.



**हिंगोली- जिल्ह्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी येथील बळसोंड परिसरात नाफेडच्या खरेदी केंद्रांवर सकाळपासूनच मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीसाठी आणले असून केंद्रासमोर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊची शैक्षणिक सहल



हिंगोली- ॲड. ग्यांनबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थे द्वारा संचलित राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनची एक दिवशी सहल दिनांक २८ डिसेंबर रोजी शनिवारी सकाळी सात वाजता शाळेतून निघाली. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष संजय गहेरवार संस्थेचे सचिव पंडित शिरसाट, संस्थेचे संचालक सुधाकर मेटकर, ज्येष्ठ शिक्षक मोरे, प्राचार्य उमेश शेळके, मुख्याध्यापक शिवशंकर डोलारे, पर्यवेक्षक सुधाकर बल्लाळ व सर्व शाळा व महाविद्यालयाचा संपूर्ण स्टाफ यावेळी उपस्थित होता. शाळेची सहल येलदरी धरण व वन विभाग उद्यान येथे नेण्यात आली. विद्यार्थ्यांना येलदरी धरण येथील वीज निर्मिती व जलसाठ्याची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर वन उद्यानातील वेगवेगळ्या वनस्पतींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली व विद्यार्थ्यांनी उद्यानाचा खूप आनंद घेतला व निसर्गरम्य वातावरणात विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आनंद घेतला विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन वनस्पती बद्दल आवड निर्माण व्हावी या दृष्टिकोनातून शाळेची सहल काढण्यात आली होती.

### ८ जानेवारीला नर्सीत रक्तदान शिबीराचे आयोजन



हिंगोली- जगदगुरू नरेंद्राचार्य महाराज भक्त सेवा मंडळाच्यावतीने दि ८ जानेवारी रोजी सामाजिक सेवाकार्य म्हणून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबीर नर्सी नामदेव येथील ग्रामीण रूग्णालयात सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. यावेळी सेवा मंडळाच्यावतीने डॉ नामदेव कोरडे यांना आयोजनाबाबत निवेदन देण्यात आले आहे. या रक्तदान शिबीरात रक्तदात्यांनी रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलिस जावयाने केलेल्या गोळीबारात सासूचाही मृत्यू, मृतांची संख्या तीनवर

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३१ डिसेंबर**

शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेला पोलीस अंमलदार यांनी सासरवाडीत जाऊन अंदाधुंद गोळीबार करून कुटुंबातील पत्नी, मुलगा, सासू, मेव्हणा, यांच्यावर शासकीय बंदुकीने गोळीबार करून त्यात त्याची पत्नी हिचा जागीच मृत्यू झाला होता. उपचारादरम्यान मेहुणा आणि सासूचाही मृत्यू झाला असून मृतांची संख्या तीन झली आहे.

या घटनेत विशेष म्हणजे वापरण्यात आलेले शासकीय बंदूक हे कुठल्या अधिकाऱ्याचे होते त्याच्याकडे कसे आले त्याने बाहेरगावी जाताना नेले कसे हेही तपासणी तेवढेच गरजेचे आहे. सेवेत समाविष्ट होण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्याला व अमलदाराला शस्त्र कसे हाताळावे याची देखील प्रशिक्षण व माहिती दिलेले असते परंतु असे असताना देखील संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना व अंमलदारांना याचा विसर कसा पडतो हे देखील विचार करण्यासारखे आहे. बिन हत्यारी पोलीस अमलदाराकडे पोलिसांचे शासकीय हत्यार आले कुठून हेही अत्यंत बारकाईने व विशेष पथकामार्फत तपासणे गरजेचे आहे. पोलीस विभागात दबक्या आवाजात जरी या विषयावर चर्चा होत असली तरी पोलिसांचे शस्त्र सांभाळणारे विभाग आज सुरक्षित आहे का शस्त्र सांभाळणारे पोलिस अमलदार प्रशिक्षित आहे का किंवा यापूर्वी कुठल्या पोलीस स्थानकाला शस्त्रसांभाळणीचे कारभार योग्यरित्या पार पाडलेले आहे का? या सर्व गोष्टीचा विचार करून जबाबदारी देण्यात येणारी शस्त्र सांभाळण्याची ड्युटी ही विचार करून अनुभवी अमलदारास व अधिकार्यासच दिले तर अशी घटना भविष्यात घडणारच नाही.

# हिंगोलीत सम्राट प्रसिंजीत विचार साहित्य संमेलनाला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

येथे सम्राट प्रसिंजीत विचार साहित्य मंचाद्वारे एक दिवशी साहित्य संमेलनाचे आयोजन दि. २९ डिसेंबर रविवार रोजी करण्यात आले होते. उद्घाटक प्रा.डॉ.विजय कुमठेकर होते.अध्यक्षस्थानी डशिवराज कोळीकर हे होते. स्वागताध्यक्ष म्हणून डॉ.अमोल धुमाळ हे होते.

सामाजिक न्याय भवन सभागृहामध्ये आयोजित केलेल्या या कार्यक्रमात सम्राट प्रसंगीताचा इतिहास आणि संस्कृती या संदर्भात विविध परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये लेखिका विमल वाघमारे, प्रा बबन इंगोले, ॲड. गणेश मेकाने, डी.जी.गोसावी, वसंत गवळी, मुरलीधर रणखांब, सुभाष वैरागड, चंद्रप्रकाश शिंदे, राजाभाऊ हातागळे, चंद्रशेखर गालफाडे यांनी सम्राट प्रसेन्जीतांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. संमेलनात प्रामुख्याने इतिहासकार विजय कुमठेकर व विश्लेषक शिवराज कोळीकर यांनी, मातंग समाजाचा प्राचीन इतिहास सांगितला कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोज डॉ. हरीश रणबावळे यांनी केले तर सूत्रसंचालन देविदास खरात यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रकाश इंगोले, बबन मोरे, दीपक रणबावळे, मधुकर कांबळे,ए.एम. खंदारे, माधव सवनेकर, प्रकाश भालेराव आदींनी परिश्रम घेतले.

# साध्वी सोनाली करपे यांचे किर्तन मनाला शांती देणारे- भाऊ पाटील



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ डिसेंबर**

गोरेगांव येथे दिनांक ३० डिसेंबर रोजी न्यू हायस्कुल व कै.बाबुरावजी पाटील उच्च मा.विद्यालय येथे गोरेगांवकर कुटुंबातील पूज्य स्व. बाबुरावजी पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित भव्य कीर्तन कार्यक्रमात साध्वी सोनाली ताई करपे यांच्या किर्तनाने उपस्थित सर्वजण मंत्रमुग्ध झाले. ताईंच्या किर्तनातील भावपूर्ण शब्दांनी प्रत्येकजण आपल्या जीवनाचा आत्मचिंतन करायला प्रवृत्त झाला. ताईंनी आपल्या किर्तनातून जीवनमूल्ये, कर्तव्य, धर्म आणि आध्यात्मिकता या विषयांवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, आपल्याला आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून जीवन जगावे.

कोण कुठे जन्माला येणार हे ईश्वराने ठरवलेले असले तरी, आपल्या कर्म करून आपण आपले भवितव्य घडवू शकतो. ताईंनी आपल्या किर्तनातून हेही सांगितले की, माणसाच्या आयुष्यात सर्वात मोठी श्रीमंती म्हणजे त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य. सकारात्मक विचार आणि हास्य यामुळे आपले जीवन सुखी आणि समृद्ध बनते. आपल्या कर्तुववाचा ठसा उमटवला पाहीजे. या उक्तीला अनुसरून ताईंनी उपस्थितांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीने आपल्या जिथे जन्माला तिथे चांगले कर्म केले पाहिजे या विचाराला पुष्टी देत ताईंनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत आपण सकारात्मक राहून चांगले कर्म करत राहावे.

कोण कुठे जन्मला येणारे ईश्वराने ठरलेले आहे यावर भाष्य करताना ताईंनी सांगितले की, आपले भाग्य आपल्या हातात आहे. आपण केलेल्या कर्मांचा परिणाम आपल्याला भोगायला लागतो.

माणसाच्या आयुष्यात सर्वात मोठी श्रीमंती म्हणजे त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य या विचाराला अनुसरून ताईंनी उपस्थितांना सकारात्मक राहण्याचा संदेश दिला. ताईंचे किर्तन ऐकून उपस्थित सर्वजण प्रेरित झाले. त्यांच्या किर्तनातून मिळालेली शांती आणि प्रेरणा त्यांच्या मनात कायमची घर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

गोरेगांव येथे आयोजित भव्य कीर्तन कार्यक्रमात साध्वी सोनाली ताई करपे यांनी आपल्या प्रेरणादायी किर्तनातून उपस्थितांना विचार करण्यास प्रवृत्त केले. ताईंनी कुंभाराच्या मातीशी झालेल्या संवादाची उपमा देऊन जीवनमूल्यांचे महत्त्व पटवून दिले. ताईंनी आपल्या किर्तनातून सांगितले की, कुंभाराने मातीला चिलीम बनवण्याचा विचार बदलून माठ बनवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे कितीतरी कुटुंबांना पाणी मिळाले आणि त्याला आशीर्वाद लाभले. या उदाहरणाद्वारे ताईंनी सांगितले की, आपल्या जीवनात आपण कोणती भूमिका निभावतो हे आपल्यावर अवलंबून असते. आपण समाजासाठी काही चांगले करण्याचा निर्णय घेतला तर आपल्यालाही समाधान मिळते आणि समाजालाही फायदा होतो. या कार्यक्रमात भाऊ पाटील गोरेगावकर यांचे समर्थक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पंचक्रोशीतील महिला, पुरुष व बालके मोठ्या संख्येने उपस्थित होते. किर्तनानंतर सर्वांना सुरुची भोजनाचा आस्वाद घ्यायला मिळाला. तसेच, कार्यक्रमाच्या ठिकाणी नेत्र तपासणी शिबिरही आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मोठ्या प्रमाणात नागरिकांनी आपले नेत्र तपासून घेतले.

या कार्यक्रमामुळे गोरेगांव परिसरातील वातावरण पवित्र झाले. साध्वी सोनाली ताईंच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांना जीवन बदलण्याची प्रेरणा दिली.



नांदेड-शहरातील खालसा हायस्कूलच्या मैदानावर ५१ वी अखिल भारतीय श्री. गुरू गोविंद सिंघजी हॉकी स्पर्धा सुरू असून या स्पर्धेत आज छत्रपती संभाजीनगर विरुध्द मुंबईचा सामना रंगला (छाया मुनवर खान )

# आयुक्त डोईफोडे यांनी घेतला विविध कामाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ३१ डिसेंबर**

सिडको क्षेत्रीय कार्यालय येथील विविध कामकाजाचा आढावा दिनांक ३१ डिसेंबर रोजी मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांनी घेऊन सिडको क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत असलेल्या पडीक मालमत्तेची पाहणी कण्यात आली.

सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत साई मंगल कार्यालय हाडको येथे स्पोर्ट्स चे ठिकान करण्याचे नियोजन चालु आसल्याचे सांगितले तसेच जिजाऊ सृष्टी, आनंद सागर सोसायटी या ठिकाणचे अभ्यासिका व उद्यान , मनपा दवाखाना यांची मनपाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांनी पाहणी करून येथील मातृसेवा आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.के. शिंदे यांच्याशी चर्चा करून अपुऱ्या सुविधा पूर्ण करण्यात येतील असे सांगण्यात आले. सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे नूतनीकरण करून त्याचे सुशोभीकरण करण्यात यावे असे आदेश देण्वयात आले. तसेच दवाखाना आणि क्षेत्रीय कार्यालयाचा रस्ता वेगळा करण्यात यावा असेही सांगण्यात आले .



व ते लवकरच मार्गी लावण्यात यावे असेही आदेश संबंधित अधिकारी सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांना देण्यात आले आहे. तसेच आनंद सागर सोसायटी येथील उद्यान व अभ्यासिकेची पाहणी करून कौतुक करण्यात आले. यावेळी अभ्यासिका येथील वृत्तपत्र , मासिके व साप्ताहिके वाचवण्यासाठी योग्य ती जागा असावी असेही सांगण्यात आले. तसेच येथील उद्यानात लहान मुलांसाठी खेळण्याची साधने कमजोर व जुनी असतील तर ती नवी घेण्याचा प्रस्ताव पाठवण्यात यावा व तंदुरुस्त असलेली साहित्यांना रंगरंगोटी करून घ्यावे असे अभ्यासिकेतील मनापा कर्मचारी यांना सांगितले. सिडको झोनअंतर्गत असलेल्या कोणत्याही समस्यांच्या मागणीचे प्रस्ताव लवकरात लवकर पाठवावे असे आदेश मनपा आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांनी दिले. यावेळी उपायुक्त अजितपाल सिंग संधू महाराज, गुलाम सादिक, सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग ,किरण सूर्यवंशी, कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक संजय नागापूरकर यांच्यासह सिडको क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचारी यांची उपस्थिती होती. सदरील कामे किरण सूर्यवंशी यांच्यामार्फत करण्यात येऊ नये. त्यांनी यापूर्वी केलेली कामे निकृष्ट दर्जाचे असल्याचे बोलले जाते.

# ६ कोटी १९ लक्ष रुपयाच्या कामाचे आ. बोढारकर यांच्या हस्ते उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ३१ डिसेंबर**

शिवसेना चा बालेकिल्ला असलेल्या नांदेड दक्षिण मधील विविध गावात विकास कामाचा धडाका आमदार आनंदराव तिडके यांनी सुरु केला असून दि ३० डिसेंबर रोजी नांदेड दक्षिण मधील जाणापुरी ते बामणी रस्त्याच्या ६ कोटी रुपयाच्या कामाचे उदघाटन करण्यात आले तर बेटसांगवी ( म) येथे गाव अंतर्गत सी सी रस्ता १४ लक्ष, सेलवाडी येथे सी सी रस्ता ५ लक्ष रुपये असे एकूण ६ कोटी १९ लक्ष रुपयाच्या कामाचे उदघाटन आमदार आनंदराव बोढारकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी नांदेड दक्षिण चे तालुका प्रमुख अशोक मोरे व ज्ञानोबा माऊली मोरे, सुदाम भाऊ मोरे, सरपंच शिवाजी



वानखेडे, सरपंच व्यंकट नरवड, बालाजी बहिरे, बळी पाटील, अनिल कदम व सर्व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते

# सुफी संत साबीरअली शाह खादरी उर्स संदल शरीफ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ३१ डिसेंबर**

शहरातून काही अंतरावर खैरका रोडवर डोंगर माळावर स्थित सुप्रसिद्ध सुफी संत हजरत सय्यद साबीरअली शाह खादरी (र.अ.) यांचा दरवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील उर्स शरीफ संदल कार्यक्रम तीन दिवस उत्साहात भव्यदिव्य साजरा करण्यात आला.

सदरील उर्स शरीफ संदलची सुरूवात देगलूर नगरीतून थेट मुखेड दर्गाह नगरीत दि.२९ डिसेंबर रोजी रविवारी करण्यात आली.संध्याकाळी 'जलसा-ए-औलिया' हा कार्यक्रम हजरत अल्लामा मोहम्मद अहेमद नक्शबंदी जुनैदी,हैद्राबाद यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. दि.३० डिसेंबर रोजी सोमवारी चरागाँ,संध्याकाळी कव्वालीचा कार्यक्रम आणि फातेहा ख्वानीने समारोप करण्यात आला.दि.३१ डिसेंबर रोजी मंगळवारी फजर नमाजानंतर कुरान ख्वानी,फातेहा,सलातो सलाम व प्रासादाचे वाटप करीत तीन दिवसीय उरूसाची सांगता करण्यात आली.



कर्नाटक, तेलंगाणा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आदि राज्यातील अनुयायी, भाविकांनी उल्लेखनीय उरूसात उपस्थिती लावलेली होती.

या प्रसंगी मुखेड-कंधारचे विद्यमान आमदार मा.डॉ.तुषार राठोड, मुखेडचे माजी नगराध्यक्ष मा.गंगाधर राठोड, नगरसेवक मा.नासेर खाँ पठाण,खैरका ग्राम माजी सरपंच, मा.लक्ष्मण पाटील,रामराव महाराज,दर्गाह मुतवल्ली सलीम पाशा खादरी,इस्माईल पाशा खादरी, यनभुरा, हाफिज जमीर अलीशाह खादरी, हजरत हाफिज व खारी मोहम्मद जमालोद्दीन खादरी,इक्बाल अलीशाह खादरी, नासरीन दर्गाह,उरूस समिती विद्यमान अध्यक्ष काझी सय्यद साबीर हुसेन खादरी,उपाध्यक्ष सय्यद सुबहानी खादरी,कोषाध्यक्ष अनवर खान पठाण, शेख आमीर कंधारी,शेख बाबामियाँ लाटवाले, सय्यद शमशोद्दीन, पठाण रूस्तूम खान,शेख मौला,अहेमद खान,मुन्ना पेंटर,शेख अहेमद,शेख ताजोद्दिन शेख इब्राहिम,शेख आमेर,शहरातील प्रतिष्ठित नागरिक,विविध भागातील अनुयायी,हजरत यांचे शिष्यगण,माध्यम प्रतिनिधी आदि उपस्थित होते.

# खोटे गुन्हा दाखल करणाऱ्यांना हद्दपार करा : तलाठी संघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३१ डिसेंबर**

देगलूर तालुक्यातील कर्तव्यावर असलेल्या महसूल प्रशासनाच्या मंडळ अधिकारी व तलाठी यांना विविध कारणाने शासकीय कामात अडथळा निर्माण करून त्रास देणाऱ्यांना हद्दपार करावे अशी मागणी तलाठी संघाने केली आहे.

देगलूर तालुक्यातील खानापूर फाटा येथे गौण खनिज पथकाच्याची तपासणी सुरू असताना मौ. भोकसखेड येथील हनुमंत अंगद मामीलवाड याने शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३२ व कलम ३५१ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच खंडणी वसूल करण्याच्या उद्देशाने खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या इसमाला हद्दपार करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या नांदेड जिल्हा शाखेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर नांदेड जिल्हा तलाठी संघाचे अध्यक्ष एन.जी.कानगुले, उपाध्यक्ष विजय जाधव, मारुती कदम, पी.व्ही. हाके, एम.जी. जमदाडे यांच्यासह महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे कार्याध्यक्ष एल.आर. देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


## संक्षिप्त वृत्त



**मुखेड-जि. प. प्रा. शाळा चिवळी येथील मुख्याध्यापक काशीराम सखाराम राठोड यांना आ.डॉ. तुषार राठोड यांचे स्विय सहाय्यक सुधीर चव्हाण, अशोक चव्हाण, देविदास राठोड यांनी शाल व पुष्पहार देऊन सेवानिवृती निरोप दिला. यावेळी शिक्षण अधिकारी कैलास होनधरणे, किशोरसिंह चौहाण, शिवा समराळे, विकास चव्हाण, सचिन चव्हाण , वैभव राठोड आदी (छायाचित्रकार गणेश आंबेकर मुखेड)**

### थडीसावळी परिसरात उसाच्या रोपांना मागणी;उस लागवड सुरू

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम थडीसावळी परिसरातील खतगांव, आदमपूर, नवे, जुने गळेगांव आदि गावातील शेत शिवारात उस लागवड करीता तयार करण्यात आलेल्या रेडीमेड रोपांना जास्त मागणी असल्याचे चित्र दृष्टीस पडत आहे.उस लागवड शेतकरी या रोपांना अधिकची मागणी करताना दिसून येत आहेत. माळशिरस,पंढरपूर, जि.सोलापूर



येथून रोपांची आयात सदरील रोपवाटिका व्यवस्थापनातून शेत मुक्कामी केली जात आहे.थडीसावळी भागात सध्या याच रोपांची लागवड होताना दिसून येत आहे.या रोपांची जात ८००५, उत्पादनात एक नंबर, प्रतिनग रोपाचे दर २ रूपये २० पैसे भाडेसहित असल्याचे शेतकरी सांगत होते. परिसरातील शेतकरी सचिन पाटील हांद्रे,सुरेश हांद्रे,थडीसावळी सरपंच शिवचंदनअनपलवार, शिवाजीसिंह ठाकूर, गळेगांवचे गोविंदराव नाईक, शिवकुमार फुलारी आदि शेतकरी सदरील रोप मागवून घेऊन उसाची लागवड करीत आहेत.

# पारडी येथील तीर्थक्षेत्र महादेव मंदिराला आ. केराम यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३१ डिसेंबर**

जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या किनवट तालुक्यातील पारडी (सी)येथील तीर्थक्षेत्र महादेव मंदिर व श्री जटेश्वर गोशाळेला आमदार भीमराव केराम यांनी आज भेट दिली असून मंदिर परिसराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले आहे. यापूर्वी स्थानिक विकास निधीतून त्यांनी मंदिराला जाण्यासाठी ३५ लक्ष रुपयाचा रस्ता उपलब्ध करून दिला असून दलित वस्ती सुधार योजनेतून सामाजिक सभामंडप देण्याचे आश्वासन त्यांनी गावकऱ्यांना दिले आहे. या प्रसंगी भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हा सरचिटनिस रमेश बद्दीवार, माजी जि. प. सदस्य सूर्यकांत आरंडकर, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, चेअरमन प्रकाश चिल्लावार,




संग्राम बीरकुले, दत्ताजी जीभकाटे, शेखर जीभकाटे, विक्रम जाधव, बंडू जीभकाटे, सुरेश काटे, उपसरपंच संजय बिज्जेवार, विजू कोडे, संजय कंधारे, विनायक राजनकर, मारोती धनजोडे, चरनदास जीभकाटे, भीमराव गवळी, संदीप भालेराव, मुरलीधर बनसोडे, अमोल येलेवार, रमेश पवार यांच्यासह पारडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.


# पद्मशाली समाज संघटनेची नुतन कार्यकारणी गठीत

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ३१ डिसेंबर**

पद्मशाली समाज संघटनेची नुतन कार्यकरणी नुकतीच गठीत करण्यात आली असून अध्यक्षपदी प्रकाश दासरवार, युवक अध्यक्षपदी नागभूषण येम्बरवार यांची तर महिला अध्यक्षपदी सौ. पुष्पाताई मच्छेवार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

जिल्हास्तरीय पद्मशाली समाज संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थित दि.३१ डिसेंबर रोजी निवडणूक प्रक्रिया घेण्यासाठी संघटनेची महत्वपूर्ण बैठक मार्कंडेय सभागृहात पार पडली. निवडणूक निर्णायक अधिकारी







म्हणून नांदेड येथील अशोक श्रीमनवार, शिवाजी अनंमवार, दत्ता कोंपलवार, अमृतवार यांनी काम पाहिले असून पद्मशाली समाज संघटनेच्या किनवट तालुकाप्रोढ अध्यक्षपदी प्रकाश दासरवार, तालुका युवक अध्यक्ष म्हणुन नागभुषन येंबरवार तर महिला तालुकाध्यक्षपदी पुष्पाताइ मच्छेवार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या वेळी आनंद मच्छेवार, प्रा. विजय उपलेंचवार, सुनील मच्छेवार, सुनील श्रीमनवार, शिवा क्यातमवार, संतोष ताडेवार , भुमन्ना कोंकलवार, मारोती मुलकेवार, मार्कंडेय सिरामवार, विवेकानंद पेरकलवार, तसेच समाज बांधव गजानन बंडेवार, प्रविण श्रीमनवार, प्रशांत बिंगेवार, सचिन बासेवार, संदेश कटकंमवार, संतोष कोंकलवार, राजेश म्यांकलवार, विठ्ठल म्यांकलवार, नरसिंग क्यातमवार, उमाकांत म्यांकलवार, इस्तारी पत्तेवार, सुरेश अलचेटिवार, किष्टु गंगुलवार, आशिष ताडेवार, किरण कस्तुरवार, प्रभाकर दासरवार, संजय मामीडवार, श्रीनिवास कनपेलीवार आदी समाज बांधव उपस्थित होते.

# संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनाचे ६५२ अर्ज मंजूर

## आतापर्यंत एकूण २४०४ अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ३१ डिसेंबर**

श्रावण बाळ व गांधी निराधार योजनाच्या अध्यक्ष पदी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष पाटील यांची नियुक्ति नंतर देगलूर तहसील मध्ये संबधित विभागाच्या कामात मोठी गती व पारदर्शकता आली असून संतोष पाटील यांनी या योजनेचा लाभ सर्वसामान्य लाभार्थ्यांना मिळावा यासाठी अविरत कष्ट घेत देगलूर तहसीलच्या प्रत्येक गावात सदरील योजनाचे लाभ घेण्याचे आवाहन केले.



दरम्यान देगलूर तहसीलमध्ये एकुण ६५९ फाइली तहसील कार्यालयाच्या संगांनी व श्रावण बाळ योजना विभागाला प्राप्त झाले होते.यामधून ६५२ फाइल मंजूर करण्यात आले. यात संजय गांधी निराधार योजना चे १६१ आणि श्रावण बाळ योजना चे एकूण ४९१ फाइली मंजूर करण्यात आले.

सन १९८० साली संजय गांधी निराधार योजना ची स्थापना करण्यात आली होती.

जवळपास गेल्या ४४ वर्षानंतर इतक्या मोठ्या संख्याने या योजनेचा लाभ लोकांना मिळाला आहे.

सदरील माहिती संजय गांधी निराधार योजना चे अध्यक्ष संतोष पाटील आणि सचिव तहसीलदार भरत सुर्यवंशी यांनी दिले असून सदरील दोन्ही योजनांचे लाभ लाभार्थ्यांना मिळाले पाहीजे यासाठी धडपडणारे, विनाविलंब सर्वसामान्यांना सहकार्य करणारे अध्यक्ष म्हणून संतोष पाटील यांची संपूर्ण तालुक्यातून कौतूक होत आहे. यापूर्वी तालुक्यातील एकूण १७४८ जणांच्या फाईली मंजूर झाल्या असून आता ६५२ फाईली मंजूर झाल्या आहेत. म्हणजे आज पर्यंत एकूण २४०४ जणांच्या फाईली मंजूर करून देण्याचा विक्रम संतोष पाटील यांनी केला आहे.संतोष पाटील यांनी स्वतः सर्व गोष्टींची काळजी घेत खऱ्या लाभार्थ्यांना याचा लाभ मिळवून दिला आहे.

# वाडी मुक्ताजी ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचे षडयंत्र : हनुमंत देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ३१ डिसेंबर**

मुदखेड तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी ग्रामपंचायत गावात समशान भूमी नसता नाही त्या नावावर अनुदान उचललेले यासह विविध विकास कामे फक्त नावालाच दाखवून ग्रामसेवकाने शासनाचा निधी हडप केला आहे पंधराव्या वित्त आयोगातील पाच



टक्के निधीही संबंधित त्यांना दिला नाही असे विविध आरोप शिवाजी देशमुख यांनी गटविकास अधिकारी मुदखेड यांच्याकडे लेखी तक्रार देऊन एका वर्तमानपत्रांमध्ये बातमी दिली असल्याने त्याच अनुषंगाने गावचे उपसरपंच हनुमंत देशमुख यांनी सदरील माहिती ही अपूर्ण आणि चुकीची असून मला व ग्रामपंचायतीला बदनाम करण्याचे षडयंत्र आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. मी एक कै. अटल बिहारी वाजपेयी व पंडित दीनदयाल जी उपाध्याय यांच्या विचारचा कार्यकर्ता असून समाजसेवेमध्ये गेल्या पंचवीस वर्षांमध्ये गावातील ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच सरपंच या माध्यमातून मी गावाची सेवा केलेली आहे. आणि माझा संपूर्ण कारभार ग्रामपंचायतचा पारदर्शक असून दिव्यांग बांधवांना दिलेले जीएसटीचे बिलासह माझ्याकडे देयके आहेत आणि समशानभूमीच्या नावावर कसल्या अद्याप माझ्या ग्रामपंचायतीला किंवा गावांमध्ये कसलाही निधी आलेला नसून ही अत्यंत चुकीची आणि अपूर्ण माहिती आहे असं मी आपल्या सर्व पत्रकार बांधवांना या ठिकाणी सांगू इच्छितो.

लोकांनी लोकशाही मार्गाने आम्हाला निवडून दिले असून लोकसेवक म्हणून आम्ही कामे करत आहोत अजून सुध्दा गावाला स्मशानभूमी नसल्याचे हणमंत देशमुख यांनी सांगीतले आहे.

# भाऊसाहेब देशपांडे एक त्यागी व्यक्तीमत्व : डॉ.शंकर विभुते

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. ३१ डिसेंबर**

भाऊसाहेब देशपांडे प्रतिष्ठानच्या वतीने वैकुंठवासी भाऊसाहेब उर्फ मार्तंडराव देशपांडे यांच्या सातव्या पुण्यस्मरण निमित्त विद्याविकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे वैकुंठवासी भाऊसाहेब देशपांडे यांच्या विवीध मान्यवरांच्या हस्ते अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कथाकथन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षास्थानी श्रीमती विजयाताई देशपांडे अम्मा तर प्रमुख पाहुणे म्हणून मल्हारराववजी देशपांडे, ॲड.मुरारजी देशपांडे, राजन देशपांडे, अरुण महाजन, नि.म. वडगावकर,गट शिक्षण अधिकारी श्री. कैलाश होनधरणे, केंद्रप्रमुख




श्रीपत वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुप्रसिद्ध साहित्यिक तथा कथाकार प्रा. डॉ.शंकर विभुते यांनी भाऊसाहेब देशपांडे यांना विनम्र अभिवादन करताना आपल्या विचारातून भाऊसाहेब देशपांडे यांच्या त्यागी वृत्तीचे चित्र रेखाटले. भाऊसाहेब देशपांडे यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्याला उजाळा देऊन ग्रामीण बोलीभाषेतील माननीय आमदार गणपतराव ही कथा सादर करून रसिकांना खेळून ठेवले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे अम्मा यांनी भाऊसाहेब देशपांडे प्रतिष्ठानच्या वतीने आजपर्यंत केलेल्या कार्याचा उजाळा देत वैकुंठवासी भाऊसाहेब देशपांडे यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.व्यंकट जोशी तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शिरीष लव्हेकर यांनी केले .या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्या विकास माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक पंचगट्टे, उपमुख्याध्यापक दावलपुरे, पर्यवेक्षक प्रशांत जोशी व विद्या विकास विद्यालयाचासंपूर्ण परिवार यांनी परिश्रम घेतले.

# शस्त्र परवाना नुतनीकरण करून घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३१ डिसेंबर**




जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड यांच्यामार्फत निर्गमीत, अभिलेखात नोंद असलेले शस्त्र परवाने ज्याची मुदत ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपुष्टात येत आहे अशा शस्त्र परवानाधारकांनी त्यांचा शस्त्र परवाना पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड यांनी केले आहे. परवानाधारकाने पुढील कालावधीत आपला शस्त्रपरवाना नुतनीकरण करुन घेण्यासाठी नियमानुसार असलेले नुतनीकरण शुल्क (चलनाने) शासनास जमा करावे लागेल. आपले शस्त्रपरवान्यात नमुद असलेल्या अग्निशस्त्राची पडताळणी जिल्हादंडाधिकारी कार्यालयात करुन, विहित नमुन्यातील अर्ज, जन्म तारखेचा पुरावा, पॅन कार्ड, आधार कार्ड, एक पासपोर्ट फोटो व मुळ शस्त्र परवाना जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड येथे दाखल करावा. याची सर्व संबंधित जिल्ह्यातील शस्त्र परवाना धारकांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat





चला छत्रपती संभाजीनगर ... लोकनेत्याच्या नागरी सत्काराला !

ऐताहासिक सत्कार सोहळ्याचे साक्षीदार होऊया !



पल्लवी सिल्लोड - ९४०३४०८९२२

लोकनेते आमदार मा.श्री.

अब्दुल सत्तार साहेबांचा

# भव्य नागरी सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा

दिनांक : 01 जानेवारी 2025,बुधवार रोजी वेळ : सायं.4 वाजता

स्थळ : मराठवाडा सांस्कृतिक क्रिडा मंडळ मैदान,छत्रपती संभाजीनगर

तसेच सालाबादाप्रमाणे याहिवर्षी मा.आ.अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमीत्त

## मोफत भव्य सर्वरोग निदान,उपचार कृत्रिम भिंगारोपण शस्त्रक्रिया व महारक्तदान शिबीर

नेत्र शस्त्रक्रिया दिनांक

| 15 डिसेंबर 2024 | 18 डिसेंबर 2024 | 29 डिसेंबर 2024 |
|---|---|---|
| रविवार रोजी | बुधवार रोजी | रविवार रोजी |

काळे चष्मे वाटप : 02 जानेवारी 2025,गुरुवार रोजी

गरजु रुग्णांनी या मोफत तपासणी,निदान व उपचार शिबीराचा लाभ घ्यावा,हि विनंती !

दिनांक : 02 जानेवारी ते 10 जानेवारी 2025

स्थळ : नॅशनल हॉस्पीटल,महाराणा प्रतापसिंह चौक,सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर

विनित व आयोजक : लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब मित्र मंडळ,छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्हा

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०१ जानेवारी २०२५



## नववर्षाच्या पहिल्या आठवड्यात पैठणचे जगप्रसिद्ध उद्यान होणार पर्यटकांसाठी खुले

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३१ :- पैठणचे जगप्रसिद्ध संत ज्ञानेश्वर उद्यान हे ६ जानेवारी रोजी खुले होत असून शुभारंभ सोहळ्याबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी उद्यानाला भेट देऊन अभियंत्यांशी संवाद साधत आवश्यक सूचना दिल्या.

जगप्रसिद्ध असलेले पैठणचे श्री संत ज्ञानेश्वर उद्यान म्हैसूरच्या वृंदावन गार्डनच्या धर्तीवर बनवलेले असल्याने हे उद्यान बघण्यासाठी पर्यटक देशाच्या कानाकोपऱ्यातून येत होते . मात्र मागील पाच वर्षापासून उद्यान बंद असल्यानेपर्यटकांमध्ये मोठी नाराजी पसरली होती तसेच स्थानिक व्यापाऱ्यांना मोठा फटका बसला होता .पर्यटकासह स्थानिक नागरिकांचीही उद्यान सुरू करण्याची मोठी मागणी जोरावर असल्याने



खासदार संदिपार भुमरे यांनी शासनाकडे पाठपुरावा करून निधी आणून पहिल्या टप्प्यामधील कामे जवळजवळ पूर्ण झाली असून संगीत रंगीत कारंज्याची यांचे काम पूर्ण होऊन त्याच्या चाचण्याही पूर्ण झाल्या असल्यामुळे उद्यान नववर्षाच्या पहिल्या आठवड्यात दि . ६ जानेवारी रोजी पर्यटकासह स्थानिकांसाठी खुले करण्यात येणारअसल्याचे उद्यानाचे अभियंता तुषार विसपुते म्हणाले . म्युझिकल रंगीत कारंजे नक्कीच आलेल्या पर्यटकांना भुरळ घातल्याशिवाय राहणार नाही . पैठणचे उद्यान सुरू करण्यासाठी खासदार संदिपान भुमरे यांनी पहिल्या टप्प्यात २७ कोटी रुपयाचा निधी उद्यानासाठी शासनाकडून मिळवून दिला .या निधीतून प्राथमिक कामे उद्यानात झाली आहेत .यामध्ये उद्यानातील रस्त्यासह उद्यान परिसरातील स्वच्छता .उद्यानात नवीन - नविनआकर्षक सुगंधी तसेच शोच्या फुलांच्या झाडांची लागवड , विविध मनमोहक झाडे उद्यान परिसरातलावण्यात आले आहे तसेच चांगल्या दर्जाचे बेड असलेली लॉन्स उद्यानात लावण्याचे काम प्रगतीपथावर आहे . उद्यान पर्यटकांसाठी सहस्थानिकांसाठी दि .६ जानेवारीला खुले करण्यात येणार असल्याने स्थानिक व्यापाऱ्यासह नागरिकात आनंदाचे वातावरण असून उद्यान बघण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर गर्दी करणार यात काही शंका नाही . मात्र अद्यापही पाटबंधारे विभागाकडून उद्यान बघण्यासाठी किती शुल्क आकारले जाणार हे अद्याप जाहीर केलेले नाही.

उद्यान सुरू व्हावे ही स्थानिकांची मोठी मागणी असल्यामुळे उद्यान सुरू करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करून पहिल्या टप्प्याच्या निधीतून विविध कामे पूर्ण झाली असून म्युझिकल फाउंटनचेही काम झाले आहे .उद्यान मुळे स्थानिक बाजारपेठेला चालना मिळणार असुन. अनेकांना याच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होणार आहे..खासदार संदीपान भुमरे.

पर्यटकांना रंगीत कारंजे घालणार भुरळ . उद्यानात नवीन पद्धतीने रंगीत संगीत कारंज्याचे दररोज दोन शो असणार असून एका शोला पाच गाणे असे दोन शोमध्ये दहा देशभक्ती, धार्मिक सहहिंदी ,मराठी गाणे पर्यटकांना मोहिनी घालणार तसेच रंगीत ५० फूट उंच उडणारे कारंजे ,सेंट्रल डोम ,अपोलो कारंजे , कारंजेही पर्यटकांचे मनोरंजन करणार.




नूतन वर्ष २०२५ सर्वांना
सुख समृद्धीचे जावो












सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# दारू नको, दुध प्या सहारा व्यसनमुक्ती केंद्राचा स्तुत्य उपक्रम



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाठ यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली सहारा व्यसनमुक्ती केंद्र व देवगिरी महानंदाच्या संयुक्त विद्यमाने ३१ डिसेंबर निमित्ताने नागरिकांना मोफत दूध वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचे उदघाटन वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते दत्ता लुटे, सहारा व्यसनमुक्ती केंद्राचे अध्यक्ष डॉ.रमेश केदार, मिलिंद महाजन, डॉ.राहुल सुरवाडे, सुनिल बढे, कारभारी सोनवणे , समुपदेशक शिल्पा थोरात, ऋषिकेश काकर, सागर काळे उपस्थित होते. या कार्यक्रमाचा २३५० नागरिकांनी लाभ घेतला.यावेळी दारू पासून होणारे दुष्परिणाम याबद्दल नागरिकांना मार्गदर्शन करून व्यसनमुक्ती संदर्भात अनेकांना समुपदेशन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदीप इंगळे, निवृत्ती तांगडे, कांचन कुलकर्णी, प्रकाश सुरडकर, रोशन पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# पीक कर्जमाफीची घोषणा वल्गना ठरू नये

## शेतकऱ्यांची महायुती सरकारकडून अपेक्षा

छत्रपती संभाजीनगर : नवीन सरकारने कारभाराला सुरुवात केली आहे. हिवाळी अधिवेशनही आटोपले. लाडक्या बहिणींना खात्यात डिसेंबरचा हप्ता येणे सुरू झाले आहे. भाजप महायुती सरकारने निवडणूक जाहीरनाम्यात केलेली घोषणा वल्गना ठरू नये, अशी अपेक्षा शेकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गेल्या काही वर्षांपासून कधी अवर्षण, कधी गारपीट, कधी ओला दुष्काळ, कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी अशा संकटांना शेतकरी सामोरे जात आहेत. परतीच्या पावसाने खरिप व रब्बी पिकांना मोठ फटका बसला आहे. पिकांची अपरिमीत हानी झाली. निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत आहेत. यंदा मृग नक्षत्राने वेळेवर हजेरी लावल्याने गतवर्षीचे दु:ख विसरून शेतकऱ्यांनी उधार, उसनवारी, बँकेकडून तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन खरिपाची पेरणी केली होती. पिके चांगली बहरली. परंतु, नंतर पावसाने ओढ दिली. परिणामी पिके करपली. यानंतर कपाशीची बोंडे फुटत असनानाच अतिवृष्टी झाली. परिणामी शेतातच कापसाच्या वाती झाल्या. कापूस वेचनी करताना शेतमजुरांना अनंत अडचणी आल्या. त्यातच वेचनीचे दर शेतकऱ्यांना परवडले नाही. कापसाला मिळालेला भाव आणि मशागतीपासून ते वेचणीपर्यंतचा खर्च पाहता शेतकऱ्यांना यंदा कापूस काहीच परवडला नाही. भावही कवडीमोल आहे.

### संकटांची मालिका

**नैसर्गिक संकटाने बळीराजा कायम संकटात आहे. गेल्या काही वर्षांपासून संकटांची ही मालिकाच सुरू आहे. निसर्गाने फटका दिल्यानंतर राज्यकर्त्यांकडून मदतीची अपेक्षा असते. परंतु, सरकार शेतकऱ्यांसाठी फक्त घोषणा करते, प्रत्यक्षात कर्जमाफी करत नाही. नव्याने आलेले सरकार प्रचंड बहुमतात आहे. त्यामुळे या सरकारने तत्काळ शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी.**

**– नारायण पाटील, लाडसावंगी**

**गतवर्षी कमी-अधिक पाऊस, अतिवृष्टी आणि परतीच्या पावसाने खरीप हंगाम हातून गेला. कापूस, सोयाबीनचे उत्पादन घटले. जो शेतमाल हातात आला त्याला हमीभावदेखील मिळाला नाही. या पिकांसाठी लावलेला खर्चही निघाला नाही. परिणामी बळीराजा कंगाल झाला आहे. शासनाकडून मदतीची आशा आहे.**

**-जनार्दन पाबळे, लोहगाव,**

**विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीने मते मिळवण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राबवून महिलांच्या खात्यात पैसे जमा केले. महिलांना मदत केली त्याचे स्वागतचआहे. नवीन सरकारचे हिवाळी अधिवेशन पार पडले. यावेळी सध्या प्रचंड आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी केली जाईल, अशी अपेक्षा होती. परंतु सरकारने दुर्लक्षच केले. सरकारचे हे धोरण योग्य नाही.**

**– आसाराम जगताप, जळगाव**

**लाडक्या बहिणींसाठी सरकारने तिजोरी उघडून योजना राबवली. याचा फायदा महायुतीला झाला. आता महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेतील महिलांना जशी तत्परतेने मदत केली तशीच मदत आर्थिक कोडीत सापडलेल्या शेतकऱ्यांना करावी.**

**तेजराव पाटील चौधरी, दुधड**

**सरकार कोणतेही असो, शेतकऱ्यांसाठी सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी घोषणा करतात, मात्र प्रत्यक्षात अमलबजावणी करायची नाही, असे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे सरकारच्या कर्जमाफीच्या घोषणांवर विश्वास नाही.**

**-परसराम घुले, घोडेगाव.**

शेतीमालास भाव नाही

कापसाप्रमाणेच सोयाबीनचीही अवस्था झाली. ऐन बाजारात सोयाबीन, कापूस येताच व्यापाऱ्यांनी दर पाडले. हमीभावाप्रमाणेही या पिकांना भाव मिळाला नाही. महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी विधानसभा निवडणूक काळात आचारसंहिता उठताच सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देण्याचे आश्वासन दिले होते, ते अद्यापही पूर्ण झालेले नाही.

महायुती सरकार राज्यात आल्यास २०१९ पासून ज्या शेतकऱ्यांवर कर्ज आहे, अशांची सरसकट कर्जमाफी करू अशी घोषणा करण्यात आली होती. तसे घोषणापत्रसुद्धा भाजपच्या वतीने काढण्यात आले होते. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री शेतकरी कर्जमाफी जाहीर करतील, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र, तसे झाले नाही. सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी जाहीर करून एकदाचा सातबारा कोरा करावा, अशी आग्रही मागणी शेकऱ्यांनी केली आहे.

# नेहरू युवा केंद्रामार्फत पैठण तालुकास्तरीय क्रीडा प्रतियोगितेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३१ डिसेंबर : युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत व शिवसेवा बहुउद्देशीय संस्था,वीर अर्जुन युवा मंडळ यांच्या सहकार्याने जिल्हा अधिकारी संकल्प शुक्लासर यांच्या मार्गदर्शनाखाली पैठण तालुकास्तरीय क्रीडा प्रतियोगितेचे आयोजन सरस्वती भुवन क्रीडा मैदान बिडकीन येथे करण्यात आले.तालुकास्तरीय क्रीडा प्रतियोगितेमध्ये १५ ते २९ वयोगटातील युवकांसाठी विविध प्रतियोगितेचे आयोजन करण्यात आले होते, मुलांमध्ये कबड्डी, १०० मीटर धावणे, व गोळा फेक तर मुलींमध्ये खो - खो, १०० मीटर धावणे, व गोळा फेक अशा विविध खेळांचे या तालुकास्तरीय क्रीडा प्रतियोगितेमध्ये आयोजन करण्यात आले. युवकांच्या मनात विविध खेळ खेळण्याची भावना निर्माण व्हावी हा प्रमुख उद्देश्य या प्रतियोगितेचा होता. तालुकास्तरीय विजेत्यांना जिल्हास्तरावर खेळण्याची संधी असल्यामुळे बहुसंख्य स्पर्धकांनी या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये उत्स्फूर्त प्रकारे सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बिडकीनगरीचे सरपंच अशोक धर्मे, सरस्वती भुवन विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. येवले सर, ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे, क्रीडा शिक्षक शेख सर, आदीची उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहरू युवा केंद्र समन्वयक पंकज धुळे, अर्जुन पवार, संकेत मोरे, वैभव जाधव, अष्टक पंडित, आशिष जाधव, बाळू कोल्हे, राहुल धुळे यांनी परिश्रम घेतले.

# इस्कॉन मधुबन केंद्रातर्फे ५,८०० भगवद्गीतांचे वितरण

छत्रपती संभाजीनगर : रविवार, २९ डिसेंबर २०२४ रोजी भगवद्गीता दान महायज्ञ उत्साहात पार पडला. संपूर्ण डिसेंबर महिन्यात इस्कॉन मधुबन केंद्रातर्फे सुमारे ५,००० भगवद्गीता वितरित करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी दिली. सोमवारी, ३० डिसेंबर २४ रोजी गीता दान यज्ञ मोहिमेअंतर्गत आणखी ८०० भगवद्गीता देणगीदारांद्वारे प्राप्त झाल्या. या गीतांच्या प्रती लगेचच विविध आश्रम शाळा आणि रुग्णालयांमध्ये वितरणाला सुरुवात झाली.

बहुजन कल्याण विकास मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आस्था फाउंडेशन, हेडगेवार रुग्णालय, स्नेह सावली, मातोश्री वृद्धाश्रम आणि बालवाडी शाळा यांच्या प्रतिनिधींना या भगवद्गीता भेट स्वरूपात प्रदान करून मोफत वितरणात सुरुवात झाली. त्याचबरोबर अभ्यासू आणि



गरजू अशा विद्यार्थ्यांना सुद्धा या भगवद्गीतांचे मोफत वितरण करण्यात येत आहे.

गीता जयंती पर्व

गीता जयंती डिसेंबर महिन्यामध्ये असते. त्याच निमित्ताने इस्कॉन जगभर डिसेंबर महिन्यात भगवद्गीता वितरण करत असते. जेणेकरून प्रत्येक घरापर्यंत प्रत्येक व्यक्तीपर्यंत भगवद्गीता पोहचेल, उत्तम जीवन जगण्यासाठीचे हे अमोघ ज्ञान प्रत्येकाला उपलब्ध व्हावे, याच एकमेव उद्देशाने भगवद्गीता दान महायज्ञाचे आयोजन करण्यात आल्याचे इस्कॉनच्या सदस्यांनी सांगितले.

या यज्ञासाठी सुंदर असा कुंड मधुबन परिसरामध्ये करण्यात आलेला आहे. भगवद्गीतेचे श्लोक म्हणत होम हवन करण्यात आले .

कुणाला थोडीही योग्य मदत केली किंवा चांगला सल्ला दिला तरी लाभार्थ्याचे आपल्याला आशीर्वाद मिळतात. आयुष्यभराचे मार्गदर्शन, कल्याण होऊ शकेल अशी भगवद्गीता जर आपण कुणाला भेट दिली, दान दिली तर अनंत आशीर्वाद प्राप्त होतात, . असे प्रबोधन यावेळी श्री जीवदया प्रभू यांनी केले. सर्वांना या गीता वितरणामध्ये गीतेच्या पठणामध्ये देखील सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. ज्या सेवाभावी शैक्षणिक संस्था,आश्रम, सेवाभावी रुग्णालय, ग्रंथालय यांना त्यांच्या वाचनासाठी भगवद्गीता त्यांच्या मागणीनुसार मोफत प्रदान करण्यात येतील. यासाठी संबंधित संस्थेचे अधिकृत प्रतिनिधींनी इस्कॉन मधुबन, अदालत रोड येथे आठवडाभरात संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी श्रीकांत मणियार यांनी आपल्या सुपुत्राची तुला दान करून १०० भगवद्गीता देणगीरूपान दान केल्या. या प्रसंगी सी. पी. त्रिपाठी, राजकुमार अग्रवाल, सोमेन बोस, प्रीती चॅटर्जी आदी मान्यवर उपस्थित होते. महायज्ञानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश लड्डा, विनोद बगडिया, शुभ गोविंद खंडेलवाल, माधव मुंडे, शुभम भुजबळ, गणेश भौमिक, अनिल गायकवाड तथा समस्त भक्तांनी परिश्रम घेतले.

# संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मीक कराडला मोक्का लावा

## मुंडेंना मंत्रिपदापासून दूर ठेवा

खंडपीठात याचिका दाखल

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहआरोपी करून वाल्मीक कराडवरही गुन्हा दाखल करावा. कराड याच्यावर मोक्काच्या कलमान्वये गुन्हा दाखल करावा. तर कराड हा राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांचा निकटचा सहकारी असल्याने संतोष देशमुख हत्या प्रकरणात नि:पक्षपणे चौकशी होण्यासाठी धनंजय मुंडे यांना मंत्रीपदापासून दूर ठेवण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

मस्साजोगचे हत्या झालेले सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय पंडितराव देशमुख यांनी ड. शौमितकुमार सोळंके यांच्या मार्फत क्रिमिनल रिट याचिका दाखल केली आहे. याचिकेनुसार मंत्री धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांच्यातील मैत्रीचा दाखला देणारी सुमारे दीडशे छायाचित्रे समाजमाध्यमावर उपलब्ध आहेत. दोघांच्याही खात्यावर परस्परांशी संबंधित छायाचित्रे असल्याचे याचिकेत म्हटले आहे. याशिवाय धनंजय मुंडे व वाल्मीक कराडच्या संबंधांचे दाखले देणारी विधिमंडळातील भाषणे आधार म्हणून उपलब्ध असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास दबावाशिवाय आणि निष्पक्षपणे करायचा असेल तर धनंजय मुंडे यांना मंत्रिपदापासून दूर ठेवावे, असे आदेश देण्याची विनंती करणारी याचिका खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

# २ व ३ जानेवारीस वीजबिल दुरुस्ती मेळाव्यांचे आयोजन;


## महावितरणचा वीजग्राहकांसाठी उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण मंडल अंतर्गत येणाऱ्या वीजग्राहकांसाठी सर्व उपविभाग कार्यालयांत २ व ३ जानेवारी रोजी वीजबिल दुरुस्ती मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील पॉवर हाऊस, छावणी, वाळूज शहर, शहागंज, क्रांती चौक, सिडको, गारखेडा व चिकलठाणा उपविभाग तसेच छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील ग्रामीण-१, ग्रामीण-२, पैठण, बिडकीन, फुलंब्री, गंगापूर, वाळूज ग्रामीण, खुलताबाद, वैजापूर-१, वैजापूर-२, कन्नड, पिशोर, सिल्लोड-१, सिल्लोड-२ व सोयगाव उपविभाग कार्यालयात वीजबिल दुरुस्ती मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. वीजबिलासंबंधित तक्रार असणाऱ्या ग्राहकांनी आपले वीजबिल सोबत घेऊन संबधित उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केले आहे. त्रूटी असलेल्या बिलांची पुढील आठ दिवसांत दुरुस्ती केली जाईल. तरी ग्राहकांनी या मेळाव्याचा लाभ घेऊन वीजबिल दुरुस्ती व बिलांसंबंधीच्या इतर तक्रारींचे निराकरण करून घ्यावे. तसेच दुरुस्त केलेले वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिडको वाळूज महानगर भागातून चोरीच्या क्रेटाकारसह आरोपी जेरबंद

## तेवीसशे किलोमीटर प्रवास करत एमआयडीसी वाळूज पोलिस व गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

वाळूज महानगर (प्रतिनिधी ) : पाच दिवसांपूर्वी सिडको वाळूज महानगर भागातून दोन क्रेटा कार चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या चोरट्यांचा एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे एक पथक व गुन्हे शाखेचे एक पथक असा संयुक्त तपास सुरू होता. या तपासकामी पोलिसांनी महाराष्ट्र मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात असा अविरत तब्बल तेवीसशे किलोमीटर प्रवास करत परराज्यांतील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळत गुन्हात वापरलेल्या वाहनासह दोन्ही क्रेटा कार जप्त केल्या आहे.



याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की , सिडको वाळूज महानगर भागातून २५ डिसेंबरच्या रात्री क्रेटा कार क्रमांक एमएच २०एफ जी ६९८८ व क्रेटा कार क्रमांक एमएच २० इवाय ८७३३ या दोन कार चोरट्यांनी धुमाकूळ केल्या होत्या. या दोन्ही कार चोरीच्या घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्या होत्या.

याप्रकरणी तपास सुरू असतांना पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर क्रेटा कार या मध्यप्रदेश येथील फिरोज सरदार शेख, जिल्हा रतलाम, राज्य याने त्याचे साथीदारासह चोरी करुन त्या विक्री करण्याकरिता राजस्थान येथे जात आहे ही माहिती मिळताच पथकाने सांचौर, राज्य राजस्थान येथे जाऊन शोध घेतला असता एम.एम.एस. हॉस्पीटल, सांचौर समोर एक व्यक्ती व गुन्हयातील चोरी गेलेली क्रेटा गाडी दिसुन आल्याने तपास पथकाने सापळा रचून फिरोज सरदार शेख व. २६ वर्षे, रा.जारडा, ता.महारगड जिल्हा मन्सर, राज्य मध्यप्रदेश व २) आशिक अली अली वय ३० वर्षे, रा. रतलाम, ता. जि. रतलाम मध्यप्रदेश राज्य. असे या दोघांना ताब्यात घेतले. यावेळी चोरी झालेली क्रेटा कार क्रमांक MH. 20. FG.6988 ही फिरोज शेख याचेकडुन जप्त करण्यात आली आहे. तर गुन्ह्यात वापरलेली दुसरी क्रेटा गाडी क्रमांक MH. 20. EY. 8733 व गुन्हा करण्यासाठी वापरलेली आय २० कार क्रमांक MH.20. BN.6411 या दोन कार वेरूळ भागात लपून ठेवलेल्या कार जप्त करत एकुण २९ लाख रुपये किमतीच्या ३ कार गुन्हात तपास करतांना जप्त करण्यात आल्या आहेत सदर आरोपींकडून इतर कार चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. हा तपास पोलीस आयुक्त प्रविण पवार व पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप गुरमे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, गुन्हे शाखा, एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक कृष्णा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. या पथकात प्रकाश गायकवाड, शाम खांडेकर, अमोल शिंदे, अमोल मुगळे, एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक प्रवीण पाथरकर, यशवंत गोबाडे, समाधान पाटील आदींचा समावेश होता.

# लोकनेते आमदार अब्दुल सत्तार अभिष्टचिंतन विशेष

## विकासाचे दीपस्तंभ

गतिशील विचार, विकासात्मक धोरण ज्यांचा अजेंडा आहे ते जनसामान्यांच नेतृत्व शिवसेना नेते , माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या सिल्लोड सोयगाव मतदार संघामध्ये जवळपास २५ हजार करोड रुपयांचा विकास निधी मिळून दिला असून त्या माध्यमातून मतदार संघाच्या गावागावांमध्ये पायाभूत मूलभूत विकासाची कामे करण्यात आली असून विविध विकास कामे सुरू आहेत.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रयत्नातून सिल्लोड व सोयगाव येथील शासकीय इमारतींचा कायापालट झाला असून दोन्ही तालुक्यांमध्ये शासकीय इमारतींचे भव्य असे काम प्रगतीपथावर सुरू आहे. यामध्ये सिल्लोड येथे प्रशासकीय मध्यवर्ती इमारत, पोलीस स्टेशन इमारत, उपजिल्हा रुग्णालय, नगर परिषद प्रशासकीय इमारत, नाट्यगृह, नगर परिषद शाळा इमारत, कृषी भवन, आदी इमारतींचा समावेश आहे. त्यासोबतच सोयगाव येथे तहसिल कार्यालय, ग्रामीण रूग्णालय, शासकीय कर्मचारी निवास्थान, पंचायत समिती कार्यालयाचे काम अंतिम टप्प्यात असून पोलीस स्टेशन इमारतीचे काम पूर्ण झाले आहेत.

आ. अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून सिल्लोड येथे एमआयडीसी ला मंजुरी मिळाली आहे. रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी ही एमआयडीसी महत्वाकांक्षी ठरणार आहे. त्यासोबतच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दरवाढ मिळावी यासाठी नॅशनल सहकारी सूतगिरणी सिल्लोड येथे उभी राहत आहे. सिल्लोड - कन्नड महामार्गावर बोरगाव लागत नॅशनल सूतगिरणीचे काम सुरू असून यंत्र सामुग्री खरेदीसाठी प्रशासकीय कारवाई पूर्ण झाली असल्याने लवकरच ही सूतगिरणी सुरू होणार आहे. केवळ सूतगिरणीच नव्हे तर कापूस ते कापड या प्रमाणे आ. अब्दुल सत्तार यांच्या दूरदृष्टीने येथे सूतगिरणी सुरू होताच टेक्स्टाईल पार्क उभारण्यात येणार आहे. ज्यामुळे विशेष करून महिला भगिनींना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

मतदारसंघात मका पीकाचे मोठया प्रमाणावर क्षेत्र आहे. त्याअनुषंगाने तालुक्यातील डोईफोडा येथे मका संशोधन केंद्र आ. अब्दुल सत्तार यांनी मंजूर करून दिले आहेत.



जालना - जळगाव रेल्वे बाबत आमदार अब्दुल सत्तार यांचा कायम प्रयत्न राहिला आहे. या प्रकल्पाची मागणी सह या प्रकल्पाला राज्य शासनाच्या हीश्याची ५० टक्के रक्कम ३५५२ कोटी रुपये केंद्राला देण्यापर्यंत आ.अब्दुल सत्तार यांची महत्वाची भूमिका राहिली आहे.

सिल्लोड तालुक्यातील १३१ गावांना पाणीपुरवठा करणारी वाटर ग्रीड योजना यासाठी आ.अब्दुल सत्तार यांनी ७०० कोटी रुपयांचा निधी मिळवून दिला. या माध्यमातून ही महत्त्वकांक्षी योजना सिल्लोड येथे राबविण्यात येत असून लवकरच तालुक्यातील १३१ गावांना फिल्टरचे शुद्ध पाणी मिळणार आहे. हर घर नळ योजनेतून १५० कोटींचा निधी उपलब्ध करून देत आ.अब्दुल सत्तार यांनी ही योजना प्रभावीपणे राबविली आहे.

तालुक्यातील धार्मिक स्थळांचा विकास व्हावा व त्या माध्यमातून पर्यटनात वाढ होवून स्थानिकांनाच्या हाताला रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने आ. अब्दुल सत्तार यांनी अजिंठा लेणी परिसरात शिवस्मारक आणि भीम पार्क उभारण्यासाठी निधी खेचून आणला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी एकनाथराव मुख्यमंत्री असतांना यांच्याहस्ते याकामाचे उदघाटन झाले . या प्रकल्पाच्या संरक्षण भिंतीचे काम आता पूर्ण झाले असून शिवस्मारक आणि भीम पार्कसाठी प्रत्येकी १०० याप्रमाणे २०० कोटी रुपयांचा निधी आ.अब्दुल सत्तार यांनी मिळवून दिला आहे.

आ.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्री मंडळाच्या विभागीय बैठकीत श्रीक्षेत्र मुर्डेश्वर संस्थान येथे विकास कामांसाठी ४५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने येथे विकास आराखडा तयार करण्यात आला असून त्याअनुषंगाने काम सुरू आहे. श्रीक्षेत्र सिद्धेश्वर महाराज संस्थान धोत्रा येथे २ कोटी रुपयांचा निधीतून भव्य सभामंडप उभारण्यात आला असून याठिकाणी विविध विकास कामांसाठी आणखी ५ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.मतदारसंघातील इतर देवस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जावाढ देण्यासह येथे भरघोस निधी मंजूर करून देण्याचे काम आ.अब्दुल सत्तार यांनी केले.

सिंचन व आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्यासाठी आ. अब्दुल सत्तार यांनी जवळपास १ हजार कोटी रुपयांचा निधी अलीकडच्या काळात मंजूर करून दिला आहे. त्या माध्यमातून निजामकालीन सिंचन व्यवस्थेची दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असून मतदारसंघातील तापी खोऱ्यात वाहून जाणारे पाणी अडवून सोयगाव तालुक्यात सिंचन क्षेत्रात वाढ करणे, तसेच सिल्लोड तालुक्यात नदीजोड प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने आ. अब्दुल सत्तार यांनी वेळोवेळी अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. यासाठी निधी खेचून आणला आज तालुक्यात सिंचन क्षेत्रात वाढ होताना दिसत आहे. म्हणूनच तर लोक आ.अब्दुल सत्तार यांना जलसाम्राट म्हणतात.

ऊर्जा व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी देखील आ. अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात जोरदार प्रयत्न केले आहेत. गाव तिथे गावठाण डीपी, आवश्यक तेथे ३३ केव्ही केंद्र तसेच शेतकऱ्यांना आवश्यक त्यावेळी डीपी देण्यासाठी आ.अब्दुल सत्तार यांनी प्रभावीपणे उपाययोजना राबविल्या आहेत. पूर्वी वीज वितरणाच्या कामासाठी मतदारसंघातील लोकांना कन्नड येथे जावे लागत होते. नागरिकांची कामे सुलभ आणि सिल्लोड येथेच व्हावीत यासाठी आ.अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने सिल्लोड ला उपविभागीय कार्यालय मंजूर झाले. आता वीज वितरणाच्या अडचणी सिल्लोड येथेच सोडविल्या जात आहेत.

सिल्लोड व परिसरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची सुविधा निर्माण व्हावी यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड येथे नॅशनल मेडिकल कॉलेज ची स्थापना करून या प्रकल्पाला सुरुवात देखील झाली आहे. सर्वसामान्यांना आरोग्याची सुविधा देण्यासाठी नॅशनल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मोलाची भूमिका बजावत आहे.

आ. अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या मतदारसंघात रस्ते विकासाला प्राधान्याने अग्रक्रम दिला आहे. जवळपास सर्व प्रमुख रस्त्यांची व पुलांची कामे मतदारसंघात पूर्ण होताना दिसत आहे. त्या सोबतच पाणंद रस्त्याचाही मोठ्या प्रमाणात विकास करण्यात आला आहे. ६०० किलोमीटर चे पाणंद रस्ते मंजूर करण्यात आले असून त्यांचे काम सध्या प्रगतीपथावर सुरू आहे. एकही प्रमुख रस्ता विकासापासून वंचित राहणार नाही असा शब्दच आ.अब्दुल सत्तार यांनी दिलेला आहे.

आ. अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघाचा चौफेर विकास साधत असताना सहकार क्षेत्राचा देखील मोठ्या प्रमाणात विकास साधला आहे. सहकारामध्ये नॅशनल सहकारी सूतगिरणी, जीनिंग प्रेसिंग, नॅशनल बँक, तालुका दूध संघ, ग्राहक, मजूर अशा विविध संस्थाची त्यांनी निर्मिती केली. कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ , तेलबिया संस्था यासारख्या सहकारी संस्थांना सक्षम करण्यासाठी त्यांनी भरीव निधी मंजूर करून दिला आहे.

आ.अब्दुल सत्तार यांच्या प्रयत्नाने मतदारसंघातील खेळाडूंसाठी सिल्लोड येथे ४० कोटी रुपयांच्या निधीतून तालुका स्टेडियम उभारण्यात येत आहे. ग्रामीण भागात त्यांनी व्यायाम शाळा बांधकाम व साहित्य खरेदीसाठी निधी उपलब्ध करून दिला.

मतदारसंघात दांडगा जनसंपर्क, लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध, सुखदुःखात कायम सोबत राहणे, संकटात मदतीला धावून येणे, रोखठोक वक्तव्य यामुळे आ. अब्दुल सत्तार सिल्लोड - सोयगाव मतदारसंघात नव्हे तर राज्यात लोकप्रिय आहेत. त्यांची कार्यशैली, गतिमान विचार आणि विकासात्मक धोरण पाहता त्यांना पुन्हा मंत्री पद मिळेल असा विश्वास त्यांचे कार्यकर्ते , समर्थक व्यक्त करीत होते. मात्र विविध समतोल साधण्याच्या प्रयत्नात त्यांना मंत्री पदापासून थांबावं लागलं. यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. १८ तास लोकांसाठी काम करणाऱ्या आपल्या नेत्याला मंत्रिमंडळात स्थान मिळावं अशी मागणी समर्थक कार्यकर्ते करीत आहेत.

**गजानन काकडे**
जनसंपर्क अधिकारी
आमदार अब्दुल सत्तार यांचे कार्यालय, सिल्लोड

## संक्षिप्त वृत्त...

### अहमदपूर तालुक्यातील राळगा येथे शिक्षण परिषद संपन्न

**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

डिसेंबर २०२४ ची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळगा येथे आज मोठ्या थाटामाटात दिमाखदार स्वरूपात संपन्न झाली. कार्यक्रम प्रारंभी भारताचे माजी प्रधानमंत्री व जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली

अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीची अध्यक्ष लक्ष्मण खांडेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या रेखा तरडे, केन्द्रप्रमुख अशोक बारमाळे,

रमाकांत खंदारे, केन्द्रीय मुख्याध्यापक भानुदास शिंदे, दिलीपकुमार शेटे, सुर्यवंशी, मनिषा गुणाले हे उपस्थित होते. राळगा येथील शाळेच्या रंगरंगोटीसाठी १ लाख ५० पन्नास हजार रूपये देणगी देणाऱ्या रामभाऊ जावीर व ग्रा.पं.च्या निधीतीून लाखोंचा निधी देऊन शाळेस भौतीक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल सरपंच राजकुमार नरवटे पाटील यांचा सत्कार शाळा व्यवस्थापन समिती राळगा यांच्या वतीने करण्यात आला.

शिक्षण परिषदेच्या यशस्वीतेसाठी गावातील नारायण नरवटे, बालाजीराव नरवटे, भुजंगराव खांडेकर, उत्तम वडेर, अंकुश सुरनर, माधवराव वडेर, विनायक राठोड, बालाजी राठोड, मोतीराम नरवटे, चंद्रकांत नरवटे, दयानंद नरवटे, उत्तमराव नरवटे,

शिवदास नरवटे, मारोती पवार, अंगणवाडीताई चंद्रकला देवकत्ते, बचत गटाच्या अध्यक्षा शुभांगी नरवटे आदींनी प्रयत्न केले.

# महाराष्ट्रातील पहिली ड्रगन फ्रुट नर्सरी औशात सुरु करावी : आ. अभिमन्यू पवार

**अभय योजनेला ३१ मार्च अखेरपर्यंत मुदतवाढ द्यावी... महावितरण विद्युत सहाय्यक रिक्त पदांची प्रतिक्षा यादी करावी...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१ डिसेंबर -**

कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्या पुनर्जिवीत करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या अभय योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ द्यावी. महावितरणच्या विद्युत सहाय्यक भरती परीक्षा मधील २८२ मराठा उमेदवारांना अधिसंख्य पदे निर्माण करून शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. यापैकी कांही उमेदवार कागद पडताळणी, वैद्यकीय तपासणीत अपात्र ठरल्याने पदे रिक्त राहिली आहेत.

या पदांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरतीची प्रक्रिया राबवावी. व औसा येथील तालुका बीज गुणन केंद्राची २५ एकर जमिन वापराविना पडून असून येथे महाराष्ट्रातील पहिली ड्रगन फ्रुटची नर्सरु सुरु करावी, अशा मागण्या आ. अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्या आहेत.

अत्यल्प पाण्यावर आणि कोरडवाहू जमिनीवर येणाऱ्या ड्रॅगन फ्रुट फळबागेची लागवड लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात वाढली आहे. पण महाराष्ट्रात ड्रॅगन फ्रुटची नर्सरी नसल्याने रोपांची तूट निर्माण होत आहे. औसा तालुका बीज



गुणन केंद्राची २५ एक्कर जमिन वापराविना पडून असून त्या जागेवर ड्रॅगन फ्रुट नर्सरी व मार्गदर्शन केंद्र सुरू करावे. या आ अभिमन्यू पवारांच्या मागणीवरून मुख्यमंत्र्यांनी कृषी प्रधान सचिवांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या विद्युत जोडण्या पुनर्जिवीत करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या अभय योजनेची मुदत ३१ डिसेंबर रोजी संपणार आहे. या अभय योजनेला औसा मतदारसंघासह संपूर्ण राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पण सोयाबीनला चांगला भाव मिळत नसल्यामुळे आणि तूरीचे उत्पन्न अजून हाती आले नसल्यामुळे इच्छा असूनही अनेकांना अभय योजनेचा लाभ घेता आलेला नाही. त्यामुळे अभय योजनेला ३१ मार्च, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी महावितरणच्या एमडी यांना कार्यवाही करण्याची सूचना दिली आहे.

या भेटीदरम्यान आ. अभिमन्यू पवार यांनी महावितरण विद्युत सहाय्यक भरती परीक्षा (जा. क्र. ४/२०१९) मधील २८२ मराठा उमेदवारांना अधिसंख्य पदे निर्माण करून शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. या २८२ पैकी बहुतांश मराठा उमेदवारांना नियुक्ती मिळाली असून काही उमेदवार कागद पडताळणी, वैद्यकीय तपासणीमध्ये अपात्र ठरल्याने कांही पदे रिक्त राहिली आहेत. या रिक्त पदांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करुन भरतीची प्रक्रिया राबवावी अशी मागणी केली.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव यांना तपासून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# तुळजापूर तालुक्यात पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार



**शेतकऱ्यांच्या जमिनी बळकवण्यासाठी शेतकऱ्यांवर बळाचा वापर ! पोलीस प्रशासन शेतकऱ्यांची दखल घेत नसल्याचा शेतकऱ्यांचा आरोप...**

**टावरलाईन मधील दलाल, एजंट, पवनचक्की टावर भु माफीया लोकांचा बंदोबस्त प्रशासनाने करावा अशी राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार गट) मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ डिसेंबर -**

तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेल्या पवनचक्कीच्या टावर लाईनमध्ये सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार जिल्हा समीतीच्या शिफारशीनुसार शेतकऱ्यांच्या जमीनीचे महसुली मोजमापन भुसंपादन विभागाकडून करुन कृषी विभाग वन विभाग यांच्यावतीने संयुक्त पहाणीद्वारे अथवा सुप्रीम कोर्टाचे आदेशाप्रमाणे २० लाख रुपये प्रतीटावर नुकसान भरपाई द्यावी व उगीच अंगात आल्यागत शेतकर्यांच्या अंगावर पोलीस, महसुली प्रशासन, न्यायालय, खासगी बॉउनसर सोडुन शेतकऱ्यांना डिवचायचे काम पवनचक्की कंपनीने करण्याचे काही कारण नाही. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण सूर्यवंशी यांनी पवनचक्की कंपन्यानी हिशोबात रहावे, अन्यथा कंपन्यांना योग्य तो धडा शिकवीला जाईल असा इशारा ३१ डिसेंबर रोजी येथील शासकीय विश्रामगृह येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिला आहे.



रिन्यु पावरने पैशाची मस्ती तुळजापूर तालुक्यात दाखऊ नये अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे समजेल. त्या भाषेत कंपनीस अद्दल घडवीली जाईल आम्ही शेतकऱ्यांसोबत मिळुन या कंपनीचा पक्का बंदोबस्त करु.

जिल्हा प्रशासनाला विनंती असेल रिन्यु पावर प्रोजेक्ट ४०० केव्ही सबस्टेशन व ट्रान्समीशन या प्रोजेक्टच्या सर्व बाधीत शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाबद्दल कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी. शेतकऱ्यांना टावर उभा करताना १५ लाख देतो म्हणुन कसलीही सम्मती न घेता विरोध बळपुर्वक डावलुन नादाला लाऊन प्रत्यक्षात २ लाखात टावर काम कम्पलीट करुन फसवणुक केल्यामुळे प्रोजेक्ट मॅनेजर लक्ष्मीनारायण दास व ठजथ अधीकारी गांगुर्डे यांच्यावर फसवनुकीचा गुन्हा दाखल करावा. तसेच टावरलाईन मधील दलाल, एजंट, पवनचक्की टावर भु माफीया लोकांचा बंदोबस्त प्रशासनाने करावा नाही तर जिल्हाधिकारी कार्यालय समोर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना घेऊन ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा सूर्यवंशी यांनी दिला.

यावेळी पत्रकार परिषदेस चिवरी उमरगा, शिरगापूर, गंधोरा या गावचे टावर बाधीत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन दशकानंतर आंब्याच्या सावलीत भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

**पोमादेवी जवळगा येथील विद्यानिकेतन शाळेतील विद्यार्थ्यांचे संमेलन...**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३१ डिसेंबर -**

भुकंपापुर्वी एकत्रितपणे शिक्षण घेतलेल्या औसा तालुक्यातील पोमादेवी जवळगा येथील विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी माजी गुरुजनांच्या उपस्थितीत आंब्याच्या सावलीत तीन दशकानंतर शाळा भरवली. आणि जुन्या आठवणीना उजाळा देत वनभोजनाचा आनंद घेतला.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करुन दिवंगत बनकर व नारायणराव काळे गुरुजी व वर्गमित्र संजय सुर्यवंशी, धनराज सुर्यवंशी, नेताजी ककोव्हाळे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर पुजा गाडीवाले, साळुंके, कुमार आबा, कमलाकर कुलकर्णी, सहदेव कांबळे यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

गावचे सुपुत्र व पुणे येथील उद्योजक संतोष फडणीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुरुजी उपस्थित होते. अच्युत मगर यांनी सुत्रसंचालन केले.



राजेन्द्र कांबळे यांनी उपस्थित गुरुजी व वर्ग मित्र, मैत्रिणी यांचे आभार मानले.

विश्वनाथ सुतार, संतोष फडणीस यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता.

राजेन्द्र कांबळे, अच्युत मगर, विश्वनाथ सुतार, संतोष फडणीस प्रताप राजपूत अनिता गोमदे गवळी, स्वाती जोशी, अरुण पाटील, प्रतिभा पाटील, योगिता सूर्यवंशी, अर्चना काळे, किरण डोलारे, मंगल मोरे, अनिता लिंबाळकर, मंगरुळे नागरसोगा, तपसे चिंचोली, हारेगाव, तुंगी, जवळगा पोमादेवी, दापेगाव, कवळी, गाढवेवाडी आणि संक्राळ येथील मित्र, मैत्रिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य लिपिक वर्गीय संघटनेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी बालाजी मोहोळकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या मराठवाडा उपाध्यक्षपदी पंचायत समिती निलंगा येथील प्रशासन अधिकारी बालाजी मोहोळकर निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची वार्षिक सभा २८ डिसेंबर रोजी जालना येथे संपन्न झाली. या वार्षिक सभेत सर्वानुमते बालाजी मोहोळकर यांची राज्य शाखेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बालाजी मोहोळकर निलंगा पंचायत समिती कार्यालयात कनिष्ठ प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मारुती जाधव, राज्य सचिव अरुण जोर्वेकर, कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी, कार्याध्यक्ष एस.एस. राऊत, सचिन मगर, पंकज गुल्हाने, संजय राऊत, सागर बाबर, एल.के. धुमाळ, गणेश कुलकर्णी, रज्जाक बागवान यांच्या सह राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष जिल्हा सचिव उपस्थित होते.

या निवडीबद्दल निलंगा पं.स.चे कार्यालयीन प्रशासन अधिकारी बालाजी मोळकर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# माणिक मूंडे, चंद्रकांत शिंदे, साकराप्पा वाघमारे यांना पत्रकारिता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

राज्यातील जेष्ठ पत्रकार माणिक बालाजी मूंडे यांना साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'दर्पण सेवा गौरव राज्य पुरस्कार २०२४' जाहीर झाला आहे. तर स्थानिक पातळीवर पत्रकार म्हणून कार्यरत असणारे जेष्ठ पत्रकार चंद्रकांत शिंदे व साकराप्पा वाघमारे यांना 'दर्पण जीवन गौरव पुरस्कार २०२४' देवून गौरव करण्यात येणार आहे.



यंदा पत्रकार चंद्रकांत शिंदे आणि साकराप्पा वाघमारे यांना हा 'दर्पण सेवा गौरव पुरस्कार २०२४' देण्यात येणार आहे. शाल, स्मृतीचिन्ह, मानपत्र पूष्पहार असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पूर्वी मा.रा. कराड, प्रा.एस.एम. कूलकर्णी, अ.ना. शिंदे, उदयकुमार जोशी, संदीप अंकलकोटे, बाबूराव श्रीमंगले, रवीकांत क्षेत्रपाळे, प्रशांत शेटे, सूरेश डबीर, सूधाकर हेमनर, दिनकर मद्देवार, संतोष अचवले, रंगनाथ वाघमारे, रामलिंग तत्तापूरे, भरतसिंह ठाकूर यांना प्रदान करण्यात आला आहे.

# वलांडीत भिषण आग; व्यापाऱ्यांचे ५० लाखांचे साहित्य जळुन खाक

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.३१ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथे ३० डिसेंबर रोजी सकाळी दहाच्या सूमारास अचानक पेट्रोल पंपाच्या समोरील दूकानातून धूर येताना नागरीकांना आढळून आले.

वेळ अमावस्याच्या निमित्ताने सकाळी व्यापाऱ्याने प्लाउडच्या दुकानात पुजा करून दिवे लावले होते. वेळ अमावस्या साजरी करण्यासाठी दुकान बंद करून गावाकडे परतले.

दिव्याने पेट घेऊन संपूर्ण दूकान पेटले. नागरीकांनी आरडाओरडा करून आजूबाजूच्या दुकानाचे कुलूप तोंडुन दूकानाचे शटर वरी केले व दुकानातील वेग वेगळी वस्तू सामान व बाहेर काढण्यास नागरीकानी सुरूवात केली.

आग लागलेल्या दुकानात लाकडी प्लाऊड असल्याने आगीने भिषण रुप धारण केले. व कमी वेळेतच आजूबाजूची सहा दूकानांनी पेट घेतला. देवणी अग्नीशमन दल यांना फोन करून कल्पना देण्यात आली. व्यापाऱ्यांची दूकाने पत्र्याच्या शेडची असल्याने बाजूची दूकाने पेटू लागली. बघता बघता अग्निशमन दल येईपर्यत पाच दूकाने पेटली.

१० ते १५ मिनीटात देवणी अग्नीशमन दलाचे अगमन झाले. त्यांनी लागलेल्या आगीस आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. इतक्यातच उदगीर व निलंगा अग्निशमन घटना स्थळी दाखल झाले. दिड ते दोन तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली.व आजूबाजूच्या दूकाने आगीच्या आटोक्यात





येण्यापासून बाल बाल बचावली.

देवणी अग्नीशमन दल प्रमूख नाजीम मोमिन, शेख मूनाफ, उदगीर अग्निशमन दलाचे आकाश अंधारे, उत्कर्ष कांबळे, आकीब शेख,सत्यजीत कांबळे, निलंगा अग्निशमन दलाचे नागेश तूरे, मलीकार्जुन शिंदे, सोमनाथ मादळे, गंगाधर करवडे आदी कर्मचारीने आगीला नियंत्रणात आणल्यामुळे एक मोठा अणर्थ टळला.

या लागलेल्या भिषण आगीत विश्वकर्मा डोअरचे ९ लाखांचे नूकसान झाले.

रूद्रा मोबाईलचे १५ लाख रूपयांचे नूकसान झाले. महालक्ष्मी अटोमोबाईलचे १३ लाख रूपयांचे साहित्य जळून खाक झाले. ३ स्टार वॉचचे ४ लाखांचे साहीत्य जळून खाक झाले.

सिध्दनाथ इलेक्ट्रीकलचे ५ लाखांचे नूकसान झाले. रायबा मेन्स वेअरचे ५ लाखांचे नूकसान झाले.

पांडूरंग कृषी सेवा केंद्रचे दिड लाखांचे नुकसान झाले. आदीचे पंचनामे व माहीती वलांडीचे मंडळ अधिकारी बालाजी केंद्रे यांनी दिली.

# परिवर्तन संस्थेच्या वतीने एक दिवशीय लघु-उद्योग प्रशिक्षण शिबीर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३१ डिसेंबर -**

परिवर्तन संस्था सुमठाणा आणि उज्जीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण रेणापुर येथे पार पडले.

पंचायत समिती सभागृह रेणापुर येथे परिवर्तन संस्था सुमठाणा आणि उज्जीवन बँक यांच्या वतीने तालुक्यातील पानगांव, आरजखेडा, तत्तापुर, गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगट यांच्याकरिता एक दिवशीय लघु उद्योग प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिवर्तन संस्थेचे मुख्य समन्वयक नागनाथ चव्हाण होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उज्जीवन बँकेचे विभागीय व्यवस्थापक गणेश मोरे, लातुर शाखेचे गुट्टे, अशीष, परिवर्तन संस्थेचे संस्थेचे सचिव बालाजी शिंदे उपस्थित होते. यावेळी मोरे यांनी अल्पभुधारक शेतकऱ्यांनी शेतीला जोडधंदा म्हणुन आणि महिलां बचत गटानी केवळ महिण्याला शे-पाचशाची बचतच न करिता स्वतःचे लघु उद्योग कसे उभारले जातील याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. तर गुट्टे यांनी उज्जीवन बँके कडून कमी व्याज दरात वैयक्तीक व समुह लघु उद्योग उभारण्याकरिता आणि शेतीसाठी लागणारे अवजारे घेण्याकरिता कमीत कमी दराने कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता बँक पुढाकार घेईल असे सांगितले. नागनाथ चव्हाण यांनी आजच्या काळातली न परवडणारी शेती आणि सध्याची महागाई यामुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांनी, महिला बचत गटांनी छोट्या मोठ्या उद्योगाकडे वळावे असे सांगितले तर बालाजी शिंदे यांनी परिवर्तन संस्था हि लघु उद्योग उभारण्या कामी अल्पभुधारक शेतकरी, महिला बचत गट आणि बँक यांच्यातील दुवा म्हणुन काम करणार असल्याचे सांगत ज्यास्तीत अल्पभुधारक शेतकरी, महिला बचत गटांनी याचा लाभ घेण्याचे अवाहनही केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रेणापुर तालुका समन्वयक विष्णु आचार्य यांनी केले.

यावेळी अंकुश चिकटे, डिंगाबर चव्हाण, किशोर कसबे, बालीका चिकटे, प्रणिता आचार्य, संजय जोगदंड, गौतम आचार्य, मोहन वायदंडे, मधुकर घोडके, त्र्यंबक घोडके, जयश्री घोडके, शितल जोगदंडसह पानगांव, आरजखेडा, तत्तापुर, गरसुळी येथील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकरी व महिला बचतगटातील दिडशे महिला उपस्थित होत्या.

# अहमदपूर परिसरात वेळा अमावस्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३१ डिसेंबर -**

काळ्या आईचे म्हणजेच धरणी मातेचे पूजन करत शेत शिवारात वन भोजनाचा खाऊ-पिऊ घालण्याचा सण म्हणून गणली जाणारी वेळाअमावस्या साजरी करण्याची परंपरा यंदाही अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी जपली.

यंदा रब्बी हंगामाच्या प्रारंभाला चांगला पाऊस झाल्याने ज्वारी, गहू, हरभरा शिवाय भाजीपाला ही पिके जोमात असून, हिरवीगार शेती वेळा अमावस्येचा आनंद द्विगुणित करणारी ठरली.

यंदा चाराही मुबलक असल्याने पशुपालकही हा सण आपआपल्या शेतात साजरा करताना दिसून आले. शेतातील लक्ष्मीचे डोहाळे जेवण म्हणून ही वेळ अमावस्या खास करून धाराशिव व लातूर जिल्ह्यात साजरी केली जाते. बाजरीच्या पिठाचे उंडे, ज्वारीच्या पिठापासून बनविलेले आंबील या खास मेनू बरोबरच भजी, भात, आंबट पदार्थ हा खास मेनू हे आजचे वैशिष्ट्य असते.

रविवारी शेतकरी कुटुंबांनी आपल्या शेतात ज्वारीच्या कडब्याची कोप करून शेतातल्या लक्ष्मीची पूजा केली. यावेळी शेतकऱ्यांचे स्नेही, मित्रगण व आप्तेष्ट मंडळीही आवर्जून उपस्थित होती.

यंदाच्या गावरान भोजनात घरगुती पदार्थ, बाजारातील फरसाण, मिठाई, फळे यांचाही या वनभोजनात समावेश दिसून आला.

वेळा अमावस्येनिमित तालुक्यातील जवळपास सर्व बाजारपेठाबंद होत्या.

तालुक्यातील सुनेगाव (शेंद्री) येथील शेतकरी शिवाजी काळे यांच्या शेतात काळ्या आईची सपत्नीक पुजा करत शेतकरी श्रीहरी काळे, प्रा. गोविंद भगत, शिवाजी सोळुंके, भद्रीनाथ शिंदे, बालाजी काळे, आशा काळे, कमल काळे, जना काळे , धनश्री काळे, प्रगती काळे, प्रज्ञा काळे, गोविंद काळे, गोपाळ काळे, प्रणव काळे, पायल काळे, प्रतीक काळे, पियुष काळे, आयुष काळे यांनी गावकऱ्या सोबत वेळा अमावस्या साजरी केली.

## नवीन वर्षात महावितरणची ग्राहकांना भेट गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडा अन् वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट मिळवा

छत्रपती संभाजीनगर : नूतन वर्षांची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेअंतर्गत ग्राहकांना मासिक वीजबिलात १० रुपये सूट देण्यात येते. मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रुपये एकरकमी सवलत मिळणार आहे.

गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना महावितरणकडून दरमहा छापील कागदी बिलाऐवजी ई-मेलद्वारे वीजबिल पाठविण्यात येते. शिवाय गो ग्रीन ग्राहकांना मासिक वीजबिलात १० रुपये सूट देण्यात येते.

महावितरणने गो ग्रीन ग्राहकांसाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता यापुढे गो ग्रीन सेवा निवडणाऱ्या ग्राहकांना दर महिन्याऐवजी पहिल्याच महिन्यातील वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे.

महावितरणच्या ३ कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत ४ लाख ६२ हजार म्हणजेच १.१५ टक्के ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तात्काळ १२० रुपये एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व नोंदणीकृत वीजग्राहकांना महावितरणकडून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहेत. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तात्काळ वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील वर्षभर व सेवेसाठी नोंदणी रद्द करेपर्यंत नोंदणीकृत ई-मेलवर वीजबिल पाठविण्यात येणार असून त्यापुढे दरमहा वीजबिलात १० रुपये सूट देण्यात येणार आहे. ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट देऊन गो ग्रीनचा पर्याय निवडता येईल.

# वाढत्या महागाईमुळे वधुपित्यांची दमछाक

## कपड्यांसह, दागिने विविध वस्तूंच्या किंमतीचा आलेख वाढला

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३१ डिसेंबर

लग्न सोहळा म्हणजे कायम,आयुष्यभर लक्षात राहावा, यासाठी हल्ली मोठा खर्च केला जातो.दुष्काळी स्थितीत, वाढत्या महागाईत लग्नसमारंभात वधुपित्यांची मोठी दमछाक होताना चे चित्र दिसून येत आहे. शहरी व ग्रामीण भागात सध्या लग्नसराई चालू झाली आहे. आपल्या मुलीच्या लग्नासाठी अनेकदा वडील आयुष्यभराची पुंजी खर्ची करतात.परंतु वाढलेल्या महागाईमुळे आणि विवाह सोहळ्यातील लागणाऱ्या दागिने,कपडे,विविध वस्तू, डेकोरेशन,जेवणाचा खर्च. डॉल्बे, या सारख्या सर्वच किमतीचा आलेख वाढतच असल्याने वधुपित्याचे मात्र बजेट कोलमडत असल्याची परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे.यंदा दुष्काळी परिस्थितीत वधूवरांच्या पालकांना विवाह सोहळे उरकावे लागणार आहेत.लग्न हे धूमधडाक्यातच झाले पाहिजे, असे अनेकांचे म्हणणे असते. अगदी प्रवेशद्वारापासून ते जेवणाच्या मेन्यूपर्यंतची प्रत्येक गोष्ट अत्यंत बारकाईने विचार करून ठरविली जाते.पण, महागाईमुळे पालकांचे कंबरडे मोडू लागले आहे.लग्न सोहळे जोमाने सुरू झालेले आहेत.अनेक पालकांनी पाल्यांचे लग्न धूमधडाक्यात करण्याचा विचार केला होता. परंतु वाढत्या महागाईमुळे त्यांच्या उत्साहावर विरजण पडू लागले आहे.सर्वच वस्तू महाग होत आहेत.वधू-वरांचा मेकअप आणि इतरही वस्तूंसाठी खर्च वाढला आहे. डॉल्बे, बॅण्डबाजा व सजावटीसही वीस ते पंचवीस टक्के दरवाढ झाली तर खाद्यपदार्थ, दूध-पनीर, मिठाई, फुले, पुष्पहार, कपडे, मंगल कार्यालये, हॉल, केटरिंग, डेकोरेशन, बॅण्ड पथक, डीजे, ऑर्केस्ट्रापर्यंत सर्वांचेच भाव वाढले आहेत त्यामुळे एकंदरीत वधुपित्याना कर्जबाजारी व्हावे लागत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

### वधुपित्याकडून विविध वस्तू

डेझर्ट कुलर, फ्रिज, फॅन, खुर्चा, डायनिंग टेबल, लोखंडी कपाट, एलईडी टीव्ही, कॉट/गादी, सोफासेट, विविध भांडी, आदी अनेक प्रकारच्या वस्तु विवाहात देण्यासाठी धडपड असते. आप-आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार त्या देण्यासाठी वधुपिता प्रयत्न करताना दिसून येतात.


### डेकोरेशनचा खर्च वाढताच.

फुलांवर व सजावटीचा सर्वाधिक खर्च दिसून येत आहे. मजुरी शुल्कातही वाढ झाली आहे. विवाह समारंभात उपयोगात येणाऱ्या खुर्चीपासून स्टेज, मंडप आदी भाड्यातही वाढ झाली आहे. गहू, तांदूळ, साखर, तेल आणि डाळींचे दर वाढल्याने लग्नाच्या जेवणावळीचा खर्च वाढला आहे.

### सोने, कपड्यांची दरवाढ.

विवाह सोहळ्यासाठी महत्त्वाचे असलेल्या सोन्याचे दर प्रतितोळा हजारांवर गेले आहेत. मागीलवर्षीच्या तुलनेत दर वाढल्याने दागिन्यांवरही अधिकचा खर्च होत आहे. कपड्यांच्या दरातही भरमसाठ वाढ झाली आहे. त्यामानाने सध्या शेतीमालाला भाव नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक
डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार
जन्म १ एप्रिल १८८९ मृत्यू २१ जून १९४०

आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण. या अर्थाने मी अलक लिहिले आहे

अलक:- (१)

### वारस

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक व सरसंघचालक आहेत परमपूजनीय डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार. ही हिंदुत्ववादी संघटना आहे. डॉक्टर हेडगेवार म्हणजे उदंड कीर्ती चे एक समर्पित जीवन. यांच्याप्रमाणेच यांच्यानंतरचे सारेच वारस समर्पित जीवनाच्या आदर्शाचे सन्माननीय-आदरणीय व्यक्तिमत्वाचे मानकरी. या सर्वांना सादर प्रणाम. आत्ता मी त्यांची आठवण करून देते.**

सरसंघचालक

१) श्री केशव बळीराम हेडगेवार (१९२५ते१९३०; १९३१ते१९४०)
२) श्री लक्ष्मण वामन परांजपे (१९३०ते१९३१)
३) श्री माधव सदाशिव गोळवलकर (१९४०ते१९७३)
४) श्री मधुकर दत्तात्रय देवरस (१९७३ते१९९३)
५) श्री राजेंद्र सिंग (१९९३ते२०००)
६) श्री के एस सुदर्शन (२०००ते२००९)
७) श्री मोहन मधुकर भागवत २२/६/२०२२ ते विद्यमान

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# 'अमृत' लक्ष्यीत गटातील उमेदवारांसाठी दि.३ पासून आयात-निर्यात प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर, दि.३१(जिमाका):- महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ('अमृत') पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत लक्ष्यीत गटातील उमेदवारांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येकी एक उमेदवार याप्रमाणे आयात निर्यात या विषयावर मोफत प्रशिक्षणाचे आयोजन शुक्रवार दि.३ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येत आहे.

तालुका निहाय व्यक्ती यांना आयात निर्यात या विषयावर मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे ह्या प्रशिक्षणामध्ये व्यवसाय कसा भरावा, बाजारपेठ पाहणी, व्यवसायाचे व्यवस्थापन, बाजार सर्वेक्षण साधने आणि तंत्र, प्रकल्प अहवाल, युनिट चे व्यवस्थापन, यशस्वी उद्योजका बरोबर संवाद, उद्योगांला भेट तसेच आयात-निर्यात करताना येणाऱ्या समस्याचे निराकरण, भारताचे परकीय धोरण, व्यापाराची तंत्रे, विविध क्षेत्रात निर्यातीच्या संधी, आयात निर्यात प्रक्रिया काय आहे यासंबंधी तज्ञ व्याख्यात्या कडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

तांत्रिक अभ्यासक्रमात निर्यात म्हणजे काय व निर्यात प्रक्रिया परकीय धोरणांचा आढावा २०१५-२० आणि २०२०-२५ आयात देशातील साप्ताहिक वस्तूंचे दर शोधणे, विश्वासार्ह खरेदीदार कसे शोधावे व निर्यातीवरील इसीओ टर्म्स पॅक हाऊस, मानक कार्य व्यवस्थापन, हवाई आणि समुद्री वाहतुकीचे उत्पादनाचे पॅकिंग, कस्टम प्रक्रिया दस्ताऐवजी करण,गुणवत्ता व्यवस्थापन व प्रमाणपत्र एफइएमए (FEM-) च्या भूमिकेचा अभ्यास, -PED- ची भूमिका व निर्यातदारासाठी अनुदाने, (DGFT) ची भूमिका व निर्यात कंपनी तयार करणे (IEC), इसीजीसी ची भूमिका व पेमेंट रिस्क व्यवस्थापन,निर्यातीची बिल तयार करण्याची प्रक्रिया, किंमत ठरवण्याच्या पद्धती व नफा वाढवणे ह्या बाबीवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी शैक्षणिक पात्रता बारावी पास, पदवी व तांत्रिक शिक्षण यांना प्राधान्य दिल्या जाईल. जातीचा उल्लेख असलेला कोणताही शासकीय कागदपत्राचा पुरावा, अंतिम शिक्षणाची मार्कलिस्ट देणे आवश्यक राहील,शाळा सोडल्याचा दाखला, महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याचे प्रमाणपत्र तहसीलदार यांचे असावे प्रवेश अर्ज व वरील कागदपत्र संबंधित एमसीईडी कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.तसेच आधार कार्ड व पॅन कार्ड आवश्यक,यासाठी 'अमृत' लक्ष्यीत गटातील उमेदवारांसाठी प्रशिक्षण यासाठी वयोमर्यादा २१ ते ५० वर्षे असून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी असल्याचा उत्पन्नाचा दाखला, विवाहित असल्यास गॅझेट/ विवाह प्रमाणपत्र / पॅनकार्डची प्रत आणि प्रत्येक तालुक्यातील उमेदवारांच्या अर्जांना प्राधान्य देऊन निवड करण्यात येईल. या प्रशिक्षणात जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा असे आवाहन विभागीय अधिकारी सुदाम थोटे यांनी केले आहे.

अधिक माहिती व संपर्कासाठी, जिल्हा प्रकल्प समन्वयक एमसीईडी प्रतिभा निमकर व कार्यक्रम समन्वयक आशा कुरवाडे(७८८८०७०४१९), यांच्याशी संपर्क साधावा. प्रत्यक्ष भेटीसाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,अ-३८ एमआयडीसी एरिया, रेल्वे स्टेशन जवळ छ.संभाजीनगर येथे संपर्क करावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमानिमित्त ग्रंथप्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर, दि.३१(जिमाका):- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम दि. ०१ ते १५ जानेवारी दरम्यान राबविण्यात येणार आहे. या वाचन पंधरवडा निमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात विविध उपक्रमांचे (ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन इत्यादी) यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या पार्श्वभुमीवर सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी कार्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उदभभघाभटन छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांचे हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे, ज्ञानेश्वर पैठणे, तांत्रिक सहाय्यक दिपक काळे, सुधाकर गायधनी, अनिल बाविस्कर, संजीव ठाकुर, श्रीमती नाटकर इ. सह परीसरातील वाचक व नागरीक उपस्थित होते. शहर व जिल्हयातील नागरिकांनी ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, तसेच जिल्हा ग्रंथालयाचे सभासदत्व देणे सुरु असून, विदयार्थी, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी केले आहे.

## सोमवारी (दि.६ जानेवारी रोजी) लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर,दि.३१(जिमाका)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. जानेवारी महिन्यासाठी सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ६ रोजी दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन होईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी अर्जांचे निवेदने, अर्ज सकाळी ११ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. वैयक्तिक तक्रार असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी,अशी सुचना देण्यात आली आहे. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.




ॲड.भास्कर मगरे (दलित आघाडी जि.प्रमुख), मा.संतोष मोहिते (शिवसेना उपजिल्हाप्रमुख), मा.गणेश सुपारकर (शिवसेना उपजिल्हाप्रमुख), डॉ.सुयोग कुलकर्णी (जि.प्रमुख शेतकरी सेना), सौ.सविताताई किवंडे (संपर्क प्रमुख म.आघाडी), सौ.कालिंदाताई ढगे (जिल्हाप्रमुख महिला आघाडी), सौ.चंदाताई शिंदे (जिल्हाप्रमुख महिला आघाडी), मा.रामेश्वर वाडेकर (जिल्हाप्रमुख उद्योग आघाडी सरकार सेना), मा.भगवान अंभोरे (शिवसेना तालुकाप्रमुख जालना), मा.अमोल ठाकुर (युवासेना जिल्हाप्रमुख), मा.शैलेश घुमारे (युवासेना जिल्हाप्रमुख), मा.जावेद शेख (अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख जालना), मा.अजय कदम (युवासेना जिल्हाप्रमुख जालना), मा.दिनेश भगत (शहर संघटक शिवसेना, मा.योगेश रत्नपारखे (शहर संघटक शिवसेना), मा.गणेश मोहिते (युवासेना उपजिल्हाप्रमुख), नजीर शेख (अल्पसंख्यांक उपजिल्हाप्रमुख), मा.राहुल गवारे (तालुकाप्रमुख युवासेना) मा.नागेश डबले (तालुकाप्रमुख युवासेना), मा.दिपक वैद्य (युवासेना शहरप्रमुख), मा.कुणाल जाधव (युवासेना शहरप्रमुख), मा.कमलेश खरे (युवासेना शहप्रमुख), मा.सगीर पहेलवान (युवासेना शहरप्रमुख), जफर खाँन पठाण (अल्पसंख्याक उपशहरप्रमुख), सौ.उज्वलाताई फोपलिया (शहरप्रमुख महिला आघाडी), मा.मेघराज चौधरी (समाजसेवक), मा.राहुल हिवराळे (मा.नगरसेवक), मा.गोपीकिशन गोगडे (मा.सभापती नगर परिषद जालना), मा.अनिल मुगदल (दिव्यांग आघाडी), सौ.सुषमाताई भाकट (शहरप्रमुख महिला आघाडी)

उपजिल्हाप्रमुख : भुषण शर्मा, भालचंद्र भोजने, राजेंद्र लाड, बाबासाहेब चिखले, विनोद तौर.
तालुकाप्रमुख : कल्याणराव अवघड, शिवाजी जऱ्हाड, दत्तात्रय बंगाळे, विशाल गाढे, अमोल सुरुंग, तात्यासाहेब चिमणे, बप्पासाहेब आर्दड, नानासाहेब वानखेडे, उदय बोराडे

सौजन्य :- शिवसेना, जिल्हा जालना